पेजिनेशनसाठी
अनुभवी व्यक्ती पाहिजे
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढयान् पिढयांचा
9601222777
9615222777
काळे ज्वेलर्स
सोने
चांदी
हिरे
नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १९३। किंमत - ४ रू | संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) | मंगळवार ११/०८/२०२६ । पाने - ६

लग्नाचा बस्ता.. राजेंद्रमध्ये बांधा !
मेन रोड, संगमनेर, फोन : ०२४२५ - २२५७४०, ७९०१०३११५५
१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेंद्र

# सरळ रेल्वेमार्गासाठी सिन्नर, संगमनेर, आंबेगावमध्ये चक्काजाम

## काम जेथे थांबले तेथून सुरू करा- माजी मंत्री थोरात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- नाशिक-पुणे हा रेल्वे मार्ग सरळ व्हावा याकरता संगमनेर तालुक्यातील हजारो नागरिकांनी एकत्र येत तीन तास ठिय्या आंदोलन केले. नागरिक महिला व युवकांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे घोषणांच्या निनादात तीन तास चक्काजाम आंदोलन झाले. यावेळी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. या हायस्पीड रेल्वे मार्गाकरता केंद्र व राज्य सरकारच्या सर्व मंजुरी मिळालेल्या असताना हे चांगले काम थांबले कसे असा सवाल करताना. जेथे रेल्वेचे काम थांबले तेथूनच काम सुरू करा असे आवाहन काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी केंद्र व राज्य सरकारला केले असून नाशिक पुणे रेल्वे ही सरळ मार्गे झाली पाहिजे अशी आग्रही मागणी केली आहे. तरुणाईचा एल्गार असलेल्या आंदोलनाने केंद्र सरकारचे लक्ष वेधले.

संगमनेर तालुक्यातील हिवरगाव पाऊस येथे सर्वपक्षीय नागरिक महिला युवक विद्यार्थी शेतकरी या सर्वांच्या उपस्थितीमध्ये भव्य रास्ता रोको झाला तीन तास झालेल्या या रास्ता रोको साठी संगमनेर अकोल्यातून अनेक नागरिक उपस्थित होते. रेल्वे आमच्या हक्काची , नाशिक पुणे सरळ रेल्वे झालीच पाहिजे या घोषणांनी परिसर दुमदुमला. रिमझिम पावसामध्ये ही हजारो नागरिक तीन तास रस्त्यावर बसून होते.

याप्रसंगी बोलताना माजी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, नाशिक पुणे सरळ रेल्वे करता आपण सातत्याने पाठपुरावा केला. २०१९ मध्ये सरकार सत्तेवर आल्यानंतर अधिक पाठपुरावा करताना स्वर्गीय अजितदादा पवार यांनी सुद्धा यामध्ये मदत केली. केंद्र सरकार, नीती आयोग, राज्य सरकार, रेल्वे या सर्व विभागांच्या या सरळ मार्गासाठी मान्यता मिळालेले आहेत. राज्य सरकारने १००० कोटी रुपये रेल्वेला दिले त्यानंतर भूसंपादन सुरू झाले. गोल्डन ट्रँगल साठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या या सरळ रेल्वे मार्गाचे काम थांबण्याचे काय कारण आहे ते कळत नाही. या अत्यंत चांगल्या कामात कुणी खोडा घातला. हा सवाल करताना सर्व मंजू-या मिळताना जीएमआरडी ची कोणतीही अडचण आली नव्हती. आताच अडचण आली कशी असा प्रश्न त्यांनी केला.

याचबरोबर पालकमंत्री राधाकृष्ण यांचे नाव न घेता त्यांनी साईबाबांचा चांगल्या कामाला आशीर्वाद असतो चांगल्या कामात कुणी राजकारण करू नये अशी टीका केली तर काही मंडळी नेहरू गार्डनच्या रेल्वे पलीकडे जात नाही अशी नाव न घेता टीका त्यांनी अमोल खताळ यांच्यावर केली. शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांच्या प्रति आम्हाला आदर आहे. परंतु समिती नेमून पुन्हा शून्यापासून काम सुरू होणार आहे त्यामुळे झालेले काम वाया जाणार आहे. समिती आली. (पान २ वर)

## समितीला मुदतवाढ नको - आ. तांबे



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - नाशिक-पुणे सेमी हायस्पीड रेल्वेचा मूळ मार्ग कोणत्याही परिस्थितीत बदलू नये, या मागणीसाठी आज क्रांती दिनाच्या निमित्ताने पुणे जिल्ह्यातील चाकण, खेड, मंचर, नारायणगाव, आळेफाटा, संगमनेर तसेच समृद्धी महामार्गावरील गोंदे फाटा आणि सिन्नर परिसरात नागरिकांनी मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरून चक्काजाम आंदोलन केले. विशेषतः तरुणांचा मोठा सहभाग या आंदोलनाचे वैशिष्ट्य ठरले.

या आंदोलनाला संबोधित करताना आमदार सत्यजीत तांबे यांनी ही कोणत्याही पक्षाची भूमिका नसून जनतेच्या अनेक वर्षांच्या मागणीचे जनआंदोलन आहे, असे स्पष्ट केले. नाशिक-पुणे रेल्वे ज्या मूळ मार्गाने प्रस्तावित झाली, त्याच मार्गाने ती झाली पाहिजे. कोणाच्याही दबावाखाली किंवा कोणत्याही कारणाने मार्ग बदलण्याचा प्रयत्न आम्ही स्वीकारणार नाही, अशी ठाम भूमिका तांबे यांनी मांडली.

(पान २ वर)

## रांचीमध्ये विद्यार्थी आंदोलनाला हिंसक वळण



नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

झारखंड लोकसेवा आयोग आणि झारखंड कर्मचारी निवड आयोग यांच्या परीक्षांमध्ये झालेल्या कथित अनियमिततेविरोधात सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनाला सोमवारी हिंसक वळण मिळाले. परीक्षांबाबतच्या कथित गैरप्रकारांचा निषेध करण्यासाठी हजारो विद्यार्थी रांची येथील विधानसभेच्या परिसरात दाखल झाले. विद्यार्थ्यांनी तेथे धरणे आंदोलन सुरू केल्यानंतर पोलिसांनी आंदोलकांना रोखण्यासाठी लाठीचार्ज केला. त्यानंतर संतप्त विद्यार्थ्यांनी पोलिसांच्या दिशेने पाण्याच्या बाटल्या आणि चपला फेकल्याने परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.

आंदोलकांना विधानसभेच्या परिसरात प्रवेश करण्यापासून रोखण्यासाठी पोलिसांनी काटेरी तारांचे बॅरिकेड्स उभारले होते. तसेच परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी वॉटर कॅननचाही वापर करण्यात आला. मात्र, पोलिसांच्या कारवाईला न जुमानता अनेक विद्यार्थी बॅरिकेड्सवर चढले. काही विद्यार्थी बॅरिकेड्सवरच नाचताना दिसून आले. त्यामुळे आंदोलनाची तीव्रता आणखी वाढल्याचे चित्र (पान २ वर)

## समितीचा निर्णय विरोधात गेला तर रस्त्यावर उतरेन - आ. खताळ

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - पुणे-नाशिक हायस्पीड रेल्वे प्रकल्पाबाबत डॉ. अनिल काकोडकर समितीचा अहवाल अत्यंत निर्णायक ठरणार असून, समितीचा निर्णय संगमनेरच्या विरोधात गेल्यास जनतेच्या हक्कासाठी सर्वप्रथम आपणच रस्त्यावर उतरू, असा स्पष्ट आणि आक्रमक इशारा आमदार अमोल खताळ यांनी दिला आहे. अहवाल सकारात्मक आला तर त्याचे स्वागत करू; मात्र संगमनेरच्या हक्काच्या रेल्वे मार्गाला नकार दिला गेल्यास वेळप्रसंगी उपोषण करण्याची वेळ आली तरी मी मागे हटणार नाही, असा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.

पुणे-नाशिक हायस्पीड रेल्वे प्रकल्प झाला पाहिजे, ही आपली भूमिका सुरुवातीपासूनच स्पष्ट आहे. हा प्रकल्प केवळ रेल्वेचा विषय नसून संगमनेर तालुक्यासह संपूर्ण परिसराच्या औद्योगिक, शैक्षणिक, व्यापारी आणि आर्थिक विकासाला गती देणारा महत्त्वपूर्ण प्रकल्प आहे, असे आमदार खताळ यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकल्पाबाबत तज्ज्ञ समिती स्थापन करण्याचा शब्द दिला होता. त्यानुसार ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. ही समिती सध्या अभ्यास करून अहवाल



सादरणार आहे. त्यामुळे अहवाल समोर येण्यापूर्वीच आंदोलन करून जनतेला वेठीस धरण्यापेक्षा तज्ज्ञ समितीचा निष्कर्ष काय येतो, हे पाहणे अधिक महत्त्वाचे आहे, अशी भूमिका खताळ यांनी मांडली.

दरम्यान, पुणे-नाशिक हायस्पीड रेल्वेच्या मागणीसाठी प्रस्तावित करण्यात आलेले चक्काजाम आंदोलन सर्वपक्षीय असल्याचा दावा केला जात असला, तरी या आंदोलनाबाबत आपल्याला कोणाचाही फोन अथवा निरोप आलेला नाही, असा दावा आमदार खताळ यांनी केला आहे.

रेल्वे प्रकल्पाच्या प्रश्नावर आपण केवळ वक्तव्ये न करता प्रत्यक्ष केंद्र सरकारकडे पाठपुरावा करत असल्याचेही खताळ यांनी स्पष्ट केले. खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्या समवेत नुकतीच नवी दिल्ली येथे केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन पुणे-नाशिक हायस्पीड रेल्वे प्रकल्पासाठी ठोसपणे पाठपुरावा केल्याचे त्यांनी सांगितले.

या भेटीदरम्यान केंद्रीय रेल्वेमंत्र्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनीही पुणे-नाशिक रेल्वे मार्गासाठी आग्रह धरल्याचे सांगितले. केंद्र सरकारदेखील या प्रकल्पाबाबत सकारात्मक असल्याचे रेल्वेमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे, असा दावा आमदार खताळ यांनी केला.

संगमनेरच्या हक्कावर तडजोड नाही- पुणे-नाशिक हायस्पीड रेल्वे मार्गाच्या भवितव्याबाबत संगमनेरमध्ये मोठी उत्सुकता आणि चिंता निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत समितीचा अहवाल हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. अहवालाच्या आधारे पुढील भूमिका निश्चित केली जाईल; (पान २ वर)

ADVANCE GOLD SIP SCHEME
गोल्ड एसआयपी योजना
गुंतवणूक फायद्याची बचत जास्तीची!
१० महिने रक्कम भरा आणि एक महिना बोनस मिळवा!
जमा झालेल्या रकमेच्या मजुरीवर 50% सूट
बुकिंग दिवसाच्या सोन्याच्या भावात खरेदी करा.
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
फोन : 02425-225924
मो : 9372012044
OM MAYUR JEWELLERS
ओममयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
आला रे आला राजपाल सेल आला..!
30% - 70% डिस्काउंट सेल
जुने दिपाली फर्निचर, बस स्टँड समोर, नारायणगाव
संगमनेर (02425) 222226 | अ.नगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132

PBM Jewellers
मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
भव्य मंगळसूत्र महोत्सव
फक्त आपल्या लाडक्या PBM ज्वेलर्स मध्ये
यामध्ये नवनवीन डिझाईन् आणि व्हरायटीचे मंगळसूत्र त्याच प्रमाणे
जुन्या 22 कॅरेट सोन्याच्या एक्सचेंज वर 0% घट
अशोक चौक, गुंडेचा हॉस्पिटल समोर,चावडी जवळ, संगमनेर
7599996999/ 8265036807

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
आजच संपर्क करा
24x7 Emergency Services

# ‘चले जाव’च्या क्रांतीची मशाल आता राज्यघटनेच्या रक्षणासाठी पेटवा - माजी मंत्री बाळासाहेब थोरात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली ९ ऑगस्ट क्रांती दिन चले जाओ चे मोठे आंदोलन झाले. देश स्वातंत्र्यासाठी अनेक वीरांनी हुतात्मे पत्करले. त्यांच्या त्यागातून देशाला स्वातंत्र्य मिळाले. राज्यघटना आली. मात्र ज्या विचारांनी स्वातंत्र्य लढ्यामध्ये कोणतेही योगदान दिले नाही. इंग्रजांविरुद्ध कोणतीही लढाई केली नाही. ते लोक जातीभेदाच्या नावावर दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत आहे. देश, लोकशाही आणि राज्यघटना वाचवण्याची याकरता या लोकशाही विरुद्धच्या विघातक शक्तींविरोधात देशातील तरुणाई सज्ज झाली असून या दिनाचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यात मोठे महत्त्व असल्याचे प्रतिपादन काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य तथा माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले आहे.

नेहरू चौक येथील अशोक स्तंभास क्रांती दिना निमित्त अभिवादन केल्यानंतर ते बोलत होते. यावेळी मा. आ. डॉ. सुधीर तांबे, सौ. दुर्गाताई तांबे, नगराध्यक्ष डॉ. मैथिलीताई तांबे, डॉ. जयश्रीताई थोरात, सोमेश्वर दिवटे, अजय फटांगरे, हिरालाल पगडाल, उपनगराध्यक्ष नूर मोहम्मद शेख, प्रा.बाबा खरात, गर्जेंद्र नाकील, नितीन अभंग, राणी प्रसाद मुंदडा किशोर टोकसे,जीवन पांचारिया, दिलीप जोशी प्रमोद कडलग, सुभाष दिघे, जालिंदर ढोकरट यांच्यासह सर्व नगरसेवक व नगरसेविका, पुरोगामी संघटनेचे विविध पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना मा.महसूलमंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, ९ ऑगस्ट क्रांती दिन हा भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली भारत छोडो हे आंदोलन या दिवशी सुरू झाले. संपूर्ण देश पेटून उठला. नंदुरबारचा अकरा वर्षाचा शिरीष कुमार देशाचा झेंडा घेऊन निघाला.

# गोवा बनावटीच्या अवैध मद्यावर राज्य उत्पादन शुल्क विभागाची कारवाई



युवावार्ता(प्रतिनिधी)- संगमनेर - येथील राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने संगमनेर शहरात गोवा राज्यातील अवैध मद्याची विक्री करणाऱ्यांविरुद्ध शनिवारी (दि. ८) रात्री धडक कारवाई केली. या कारवाईत ५ लाख ३८ हजार ६४० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, दोन आरोपींना अटक करण्यात आली झाह. त्यांच्याकडून गोवा बनावटीच्या मद्यासह विविध नामांकित बँडच्या रिकाम्या बाटल्या, बनावट बुचे व दुचाकी वाहन असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

राज्य उत्पादन शुल्क विभागात संगमनेर शहरातील शिवाजीनगर, वडजे - मळा परिसरात गोवा राज्यात निर्मित - आणि महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेल्या मद्याची विक्री तसेच बनावट मद्यनिर्मिती होत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार शनिवारी रात्री निरीक्षक योगेश सावखेडकर यांच्या पथकाने कारवाई केली. यावेळी शिवकुमार मनोजकुमार कालडा आणि सौरभ अरविंद पापडेजा (दोघेही रा. संगमनेर) यांच्याकडून गोवा बनावटीचे तसेच महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेले रॉयल इम्पॅक्ट व्हिस्कीचे ३४ खोके, विविध नामांकित ब्रँडच्या रिकाम्या बाटल्या, बनावट बुचे व दुचाकी वाहन असा एकूण ५ लाख ३८ हजार ६४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींची चौकशी केली असता त्यांनी सदरचा मद्यसाठा संगमनेर येथील हॉटेल सुरुची नेहरू चौक येथून विक्री केल्याचे सांगितले. त्यानंतर संबंधित ठिकाणाहून नामांकित ब्रँडच्या बनावट दारूच्या बाटल्या व ६१ हजार ३१० रुपये किमतीच्या मद्याच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या. दोन्ही आरोपींना ९ ऑगस्ट रोजी संगमनेर न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी मंजूर केली. सदर कारवाई निरीक्षक योगेश सावखेडकर, उपनिरीक्षक प्राची देखणे, उपनिरीक्षक प्रशांत गायकवाड, भरारी पथक क्रमांक २ श्रीरामपूरचे वसंत पालवे, विपुल कर्पे, विमल घोलप, स्वाती फटांगरे, मोहिनी घोडेकर, सचिन बटुळे यांच्या पथकाने केली.

# दिगंबर नवाळी यांना आदिवासी समाज भूषण पुरस्कार प्रदान



**युवावार्ता (प्रतिनिधी)**

अकोले - आदिवासी सामाजिक बहुउद्देशीय संस्था, अहिल्यानगर यांच्या वतीने ९ ऑगस्ट जागतिक आदिवासी दिन २०२६ या पवित्र निमित्ताने आदिवासी समाज भूषण पुरस्कार २०२६ देऊन दिगंबर नवाळी यांना सन्मानित केले आहे. हा पुरस्कार त्यांनी आदिवासी समाजाच्या परंपरा, रूढी, संस्कृती, लोककला आणि सामाजिक मूल्यांचे जतन व संवर्धन करताना आधुनिक शिक्षणाची कास धरणे ही काळाची गरज आहे, हा संदेश त्यांनी आपल्या कार्यातून समाजापुढे ठेवला आहे. त्यांच्या उल्लेखनीय कार्याचा गौरव म्हणून त्यांना विविध प्रतिष्ठित संस्थांकडून अनेक राज्यस्तरीय पुरस्कार या अगोदर सन्मान प्राप्त झाले आहेत.

शिक्षण, समाजसेवा, आदिवासी समाजाची एकजूट, सांस्कृतिक जतन, युवकांना रोजगाराभिमुख मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या त्यांच्या उल्लेखनीय, सर्पित व प्रेरणादायी कार्याची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार देण्यात आला आहे.

हा पुरस्कार मिळाल्याबद्दल आमदार डॉ.किरण लहामटे माजी आ.वैभव पिचड यांचे सह आदिवासी कृती समिती , सरपंच संतोष बनसोडे, रामनाथ भोजने,यांचे सह सर्व मित्र मंडळा कडून अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

# संगमनेर ते अंतापूर पायी दिंडी सोहळा ११ ऑगस्टपासून

युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर -

श्री दावल मलिक बाबा यांच्या भक्तांच्या वतीने आयोजित २२ वा पायी दिंडी सोहळा यंदा ११ ऑगस्ट ते १७ ऑगस्टदरम्यान संगमनेर ते अंतापूर (जि. नाशिक) असा भक्तिमय वातावरणात पार पडणार आहे. या सोहळ्याची सुरुवात ११ ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजता रुद्राक्ष कॉलनी, लक्ष्मीनगर (गुंजाळवाडी), संगमनेर येथून पालखी पूजनानंतर होणार आहे. दिंडीचा मार्ग मानोरी, लासलगाव, चांदवड, लोहणेर, ताहराबाद मार्गे अंतापूर असा असून, विविध ठिकाणी भाविकांसाठी चहा-नाश्ता, भोजन व मुक्कामाची व्यवस्था करण्यात आली आहे. १६ ऑगस्ट रोजी अंतापूर येथे आजागुरू महाराजांच्या दर्शनानंतर दिंडीचा मुक्काम, तर १७ ऑगस्ट रोजी पहाटे स्वखर्चाने परतीचा प्रवास होणार आहे. दिंडीमध्ये सहभागी भाविकांसाठी भोजन व अन्य व्यवस्था करण्यात आली असून, प्रवेश शुल्क ५५१ रुपये आहे. या पायी दिंडी सोहळ्यात मोठ्या संख्येने भाविकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# हत्येच्या निषेधार्थ अहिल्यानगर बंद



अहिल्यानगर - पालिका कंत्राटी कर्मचारी धीरज कचरुसिंग परदेशी यांच्यावर झालेल्या प्राणघातक हल्ल्यानंतर उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाल्याने आज सोमवारी अहिल्यानगर शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला. हल्लेखोरांना कठोरात कठोर शिक्षा व्हावी या मागणीसाठी ही हाक देण्यात आली होती. या बंदला शहरातील व्यापाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. व्यापाऱ्यांनी आपली दुकाने बंद ठेवत बंदमध्ये सहभाग नोंदवला.

# पान १ वरून रांचीमध्ये विद्यार्थी....

रांचीमध्ये पाहायला मिळाले. विद्यार्थ्यांच्या मोठ्या मोर्चाच्या पार्श्वभूमीवर झारखंड विधानसभेच्या परिसरात पोलिसांनी कडेकोट सुरक्षा व्यवस्था केली आहे. विधानसभेभोवती सहा स्तरांची सुरक्षा तैनात करण्यात आली असून, परिसरातील हालचालींवर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या माध्यमातून नजर ठेवली जात आहे. मोठ्या संख्येने सुरक्षा कर्मचारी आणि पोलिस दल तैनात करण्यात आले आहे. दरम्यान, गेल्या नऊ दिवसांपासून उपोषण करणारे आंदोलक नेते देवेंद्रनाथ महतो यांचाही विधानसभेकडे निघालेल्या मोर्चात सहभाग होता. प्रकृती खालावल्याने ते रुग्णवाहिकेतून मोर्चात सहभागी झाले. त्यांच्या उपस्थितीमुळे आंदोलनाला आणखी धार मिळाली. विद्यार्थ्यांच्या मागण्यांना पाठिंबा देत भाजपच्या आमदारांनीही मुख्यमंत्री निवासस्थानाबाहेर धरणे आंदोलन केले. मात्र, पोलिसांनी काही वेळाने या आमदारांना तेथून हटवले.

त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला आता राजकीय पाठिंबाही मिळू लागल्याचे चित्र निर्माण झाले आहे. JPSC आणि JSSC परीक्षांमधील कथित अनियमितता आणि परीक्षा प्रक्रियेतील गैरप्रकारांचा आरोप करत विद्यार्थी गेल्या १७ दिवसांपासून आंदोलन करत आहेत. झारखंडमध्येही विद्यार्थ्यांवर लाठीमार, काटेरी तारांचं कुंपण भेदून विद्यार्थी विधानसभेसमोर पोहोचले, नऊ दिवसांपासून उपोषणावर असलेले देवेंद्रनाथ सुद्धा आंदोलनात झारखंडमधील रांचीतजेपीएससी-जेएसएससी परीक्षांमधील अनियमिततेच्या निषेधार्थ हजारो विद्यार्थी विधानसभेजवळ जमले आहेत. त्यांनी धरणे आंदोलन सुरू केल्याने पोलिसांना लाठीचार्ज करावा लागला.

विद्यार्थ्यांकडून पाण्याच्या बाटल्या आणि चपला फेकण्यात आल्या. पोलिसांनी काटेरी तारांचे अडथळे आणि पाण्याचे फवारे मारून आंदोलकांना रोखण्याचा प्रयत्न केला असता, विद्यार्थी अडथळ्यांवर चढून नाचताना दिसले. दुसरीकडे, विधानसभेभोवती सहा स्तरांची सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली असून, सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे परिस्थितीवर लक्ष ठेवले जात आहे.

पान १ वरून

# समितीला मुदतवाढ नको...

नाशिक-पुणे रेल्वेच्या तांत्रिक अडचणींचा अभ्यास करण्यासाठी डॉ. अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीला दिलेली ६० दिवसांची मुदत कोणत्याही परिस्थितीत वाढवू नये आणि ठरलेल्या मुदतीत अहवाल द्यावा, ही आंदोलनकर्त्यांची प्रमुख मागणी असल्याचे तांबे यांनी सांगितले. समिती नेमली आहे, हे स्वागतार्ह आहे. मात्र समितीला मुदतवाढ देऊन विषय पुन्हा लांबणीवर टाकला जाऊ नये. ६० दिवसांत स्पष्ट निर्णय झाला पाहिजे, असे ते म्हणाले. समितीने केवळ जीएमआरटीसंदर्भातील तांत्रिक अडचणींचा अभ्यास न करता जनतेच्या भावना समजून घेण्यासाठी प्रत्येक तालुक्यात जनसंवाद घ्यावा, अशी दुसरी महत्त्वाची मागणी तांबे यांनी केली. या समितीत डॉ. अनिल काकोडकर यांच्यासोबत नाशिक व पुणे विभागीय आयुक्त तसेच रेल्वे बोर्डाच्या अधिकाऱ्यांचा समावेश आहे. त्यामुळे तांत्रिक बाबींसोबतच या भागातील नागरिक, विद्यार्थी, शेतकरी, व्यापारी, कामगार आणि तरुणांच्या अपेक्षांचाही विचार समितीने करावा, असे तांबे यांनी स्पष्ट केले.

# समितीचा निर्णय विरोधात गेला तर...

मात्र संगमनेरच्या हक्कावर गदा आली तर कोणत्याही परिस्थितीत गप्प बसणार नसल्याचे खताळ यांनी स्पष्ट केले आहे. पुणे-नाशिक रेल्वे झालीच पाहिजे, ही माझी ठाम भूमिका आहे. समितीचा अहवाल सकारात्मक असेल तर त्याचे स्वागत करू. पण निर्णय संगमनेरच्या विरोधात गेला, तर लोकप्रतिनिधी म्हणून सर्वप्रथम मीच जनतेसोबत रस्त्यावर उतरेन. जनतेच्या हक्कासाठी संघर्ष करण्याची आणि वेळप्रसंगी उपोषण करण्याची वेळ आली तरी मागे हटणार नाही, असे आमदार अमोल खताळ यांनी ठणकावून सांगितले.

# प्रख्यात सर्जिकल ऑन्कोलॉजिस्ट डॉ. अंबरीश चटर्जी यांची एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये पूर्णवेळ सेवा




युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक - कॅन्सर उपचाराबाबत रुग्णांचा सर्वाधिक विश्वास मुंबईतील टाटा मेमोरियल हॉस्पिटलवर असतो. आता टाटा मेमोरियल हॉस्पिटलचा प्रदीर्घ अनुभव असलेले आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर उच्च प्रशिक्षण घेतलेले प्रख्यात सर्जिकल ऑन्कोलॉजिस्ट (कर्करोग शस्त्रक्रिया तज्ज्ञ) डॉ. अंबरीश चटर्जी हे एसएमबीटी हॉस्पिटल व कॅन्सर इन्स्टिट्यूट येथे पूर्णवेळ कन्सल्टंट म्हणून रुजू झाले आहेत. चार वर्षांपूर्वी सुरू झालेल्या एसएमबीटी कॅन्सर इन्स्टिट्यूटमध्ये आता टाटा मेमोरियलचा अनुभव असलेले तज्ज्ञ उपलब्ध झाल्याने नाशिक, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, जळगाव, धुळे, नंदुरबार, ठाणे व पालघर जिल्ह्यातील रुग्णांना जटील कॅन्सर शस्त्रक्रियांचे जागतिक दर्जाचे उपचार आपल्या अगदी जवळच मिळणार आहेत. विशेष म्हणजे, टाटा मेमोरियल हॉस्पिटलचे एसएमबीटी हॉस्पिटलसोबत तांत्रिक मार्गदर्शनाचा करार असल्यामुळे रुग्णांना जागतिक दर्जाची आरोग्यसेवा उपलब्ध झाली आहे.

डॉ. अंबरीश चटर्जी यांनी एम. सी. एच. (सर्जिकल ऑन्कोलॉजी) ही कर्करोग शस्त्रक्रियेतील सर्वोच्च पदवी टाटा मेमोरियल हॉस्पिटल, मुंबई येथून संपादन केली आहे. त्यांना या क्षेत्रातील १० वर्षांपेक्षा अधिक काळचा दांडगा अनुभव आहे. याशिवाय इटलीतील मिलान येथील प्रतिष्ठित ‘नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूट’मधून त्यांनी येथून सायटोरिडक्टिव्ह सर्जरी आणि क्खझएउ मध्ये फेलोशिप पूर्ण केली आहे. तसेच जटील मल्टी-ऑर्गन शस्त्रक्रियांचे विशेष उच्च प्रशिक्षण घेतले आहे. त्यांचे २५ हून अधिक संशोधनपर शास्त्रीय लेख आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये प्रकाशित झाले आहेत.

कर्करोगाच्या उपचारात शस्त्रक्रिया हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा मानला जातो. डॉ. चटर्जी हे जठर, आतड्यांचा कर्करोग यकृत-पित्ताशय गर्भाशय व अंडाशयाचे कर्करोग तसेच दुर्बिणीद्वारे अर्थात रोबोटिक किंवा लॅप्रोस्कोपिक केल्या जाणाऱ्या क्लिष्ट शस्त्रक्रियांमध्ये तज्ज्ञ मानले जातात. यकृताचा भाग कापून काढण्याच्या ‘ॲडव्हान्स लिव्हर रिझेक्शन्स’सारख्या आव्हानात्मक शस्त्रक्रिया करण्यात त्यांचा हातखंडा आहे.

एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये डॉ. चटर्जी यांची पूर्णवेळ सेवा उपलब्ध झाल्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे. आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेअंतर्गत सर्व रेशनकार्ड धारकांसाठी येथे मोफत उपचार, केमोथेरपी आणि शस्त्रक्रिया उपलब्ध आहेत. एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये डॉ. अंबरीश चटर्जी यांची ओपीडी सेवा सोमवार ते शुक्रवार सकाळी ९.०० ते दुपारी ४.३० या वेळेत उपलब्ध असेल. अधिक माहितीसाठी रुग्णांनी ०२५३-६९४०००० या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन हॉस्पिटल प्रशासनाने केले आहे.

## एसएमबीटीची 'कॉम्प्रिहेन्सिव्ह कॅन्सर केअर सेंटर'कडे वाटचाल

**डॉ. अंबरीश चटर्जी यांच्या रुजू होण्याने एसएमबीटी कॅन्सर इन्स्टिट्यूटची सेवा ३६० अंश परिपूर्ण झाली आहे. मुंबईतील टाटा हॉस्पिटलच्या धर्तीवर आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रोटोकॉल्स पाळून रुग्णांना सर्वोत्तम उपचार दिले जात आहेत. एसएमबीटीमध्ये सर्जिकल ऑन्कोलॉजिस्ट डॉ. अंबरीश चटर्जी व डॉ. विनायक शेनगे, मेडिकल ऑन्कोलॉजिस्ट डॉ. संदीप इशी, बालरोग कॅन्सर तज्ज्ञ डॉ. पिंकी शाह-काळे आणि हेमॅटो ऑन्कोलॉजिस्ट डॉ. गिरीश बदरखे यांची तज्ज्ञ टीम कार्यरत आहे. येथे अत्याधुनिक ऑपरेशन थिएटर, आयसीयू तसेच बोन मॅरो ट्रान्सप्लांट (इचढ) आणि CAR-T सेल थेरपीची सुविधा उपलब्ध आहे. लवकरच अद्ययावत पेट स्कॅन आणि रेडिएशन थेरपी सुरू होत असून, एसएमबीटी हे उत्तर महाराष्ट्रातील सर्वात मोठे आणि पूर्ण प्रभावी ‘कॉम्प्रिहेन्सिव्ह कॅन्सर केअर सेंटर’ होणार आहे.**

**– सचिन बोरसे**

**(संचालक – आरोग्यसेवा, एसएमबीटी सेवाभावी ट्रस्ट)**

# पान १ वरून सरळ रेल्वेमार्गासाठी...

म्हणजे धोका आहे.

हा खेळ जनतेच्या भावनेशी आहे विकासाशी आहे. या सरळ रेल्वे मार्गामुळे देशाशी कनेक्टिव्हिटी वाढणार आहे .येथील शेतकरी, व्यापारी, उद्योजक ,विद्यार्थी, तरुण यांना मोठ्या संधी निर्माण होणार आहेत. भविष्यातील पिढ्यांच्या विकासासाठी होणाऱ्या या रेल्वेमध्ये कोणीही राजकारण करू नये. सर्वांनी एकत्र येऊन लढा दिला पाहिजे असे आवाहन करताना ही रेल्वे मार्गे सरळच झाली पाहिजे याचबरोबर जेथे रेल्वेचे काम थांबले तेथूनच सुरू करा अशी आग्रही मागणी काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी केंद्र सरकार व राज्य सरकारकडे केली आहे.

पद्मश्री रघुवीर खेडकर म्हणाले की मी कलावंत म्हणून नाशिक पुणे सरळ रेल्वे मार्ग झाली पाहिजे अशी आग्रही मागणी करत आहे. हे संगमनेरच्या प्रवरेचे पाणी आहे. संगमनेरचे रक्त आहे. ते थांबत नाही. आमची प्रगती कोणी थांबू शकत नाही. सरळ रेल्वे मार्गासाठी सर्व जाती धर्माचे लोक एकत्र आले आहेत. साईबाबा आमच्या हृदयात आहेत भावनिक शब्द वापरून दिशाभूल करण्याचा प्रयत्न करू नका. बस झाली तुमची दिशाभूल करण्याची पद्धत. हक्काची रेल्वे मिळाली पाहिजे असा सांगताना विकासाला कोणी अडवा येत असेल तर त्याला आडवा करा असे आवाहनही त्यांनी जनतेला केले.

तर मा. आ. डॉ. सुधीर तांबे म्हणाले की, नाशिक पुणे सरळ रेल्वे मार्ग हा नैसर्गिक आहे मात्र संगमनेर तालुक्याचा विकास थांबवण्यासाठी काही मंडळींनी जाणीवपूर्वक या मार्गामध्ये बदल केला आहे. संगमनेर चे नवीन लोकप्रतिनिधी संगमनेरच्या बाजूने कधी बोलत नाहीत. हा लढा भविष्यातील पिढ्यांसाठी असून सर्वांनी एकत्र आले पाहिजे. रेल्वेमुळे विकासाचा मोठा टप्पा गाठला जाणारा असून केंद्र सरकारने जनतेचा आवाज ऐकून तातडीने सरळ मार्गे रेल्वे करावी असे आवाहन त्यांनी केले

तर डॉ.जयश्रीताई थोरात म्हणाल्या की, नाशिक पुणे सरळ रेल्वे हे स्वर्गीय अजित दादांचे स्वप्न होते. राष्ट्रवादी उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांनी सुद्धा या कामासाठी अधिक लक्ष दिले पाहिजे. चांगल्या कामांमध्ये राजकारण नको जनतेच्या हिताचे राजकारण करा मताचे नको असे सांगताना काही मंडळी फक्त पोस्टरबाजी करत असल्याची टीका त्यांनी विरोधकांवर केली. याचबरोबर या रेल्वेमुळे शेतकरी विद्यार्थी उद्योजक युवक यांना भविष्यात मोठी संधी मिळणार असून हा लढा साईबाबांच्या श्रद्धा आणि समोरच्या मार्गाने आहे. साईबाबा नेहमी सत्याच्या पाठीमागे असतात मात्र काही लोकांना संगमनेरची प्रगती पहावत नसल्याने ते अडचणी निर्माण करत असल्याची टीका त्यांनी केली

यावेळी प्रा हिरालाल पगडाल, रामहरी कातोरे, छात्र भारतीचे अनिकेत घुले, डॉ कोल्हे, अमर कतारी, विश्वासराव मुर्तडक, सिताराम राऊत, उत्कर्षाताई रूपवते, अजय फटांगरे, सोमेश्वर दिवटे यांनीही सरकारच्या धोरणांवर टीका केली. प्रांताधिकारी व उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी निवेदन स्वीकारले. चाकण औद्योगिक वसाहतीसह आंबेगाव, जुन्नर आणि खेड तालुक्यात मोठ्या प्रमाणावर उत्पादित होणारा शेतमाल प्रमुख बाजारपेठेपर्यंत वेगाने पोहोचवण्यासाठी तसेच या भागातील विद्यार्थी, व्यावसायिक आणि नागरिकांच्या प्रवासासाठी पुणे- नाशिक हाय स्पीड रेल्वे मार्ग अत्यावश्यक आहे. या रेल्वे मार्गाबाबत जनतेच्या भावना सरकारपर्यंत पोहोचविण्यासाठी शांततेचे मार्गाने आंदोलन करण्यात येत असून रेल्वे मार्ग मंजूर होईपर्यंत आपला लढा सुरूच राहील अशी ग्वाही राज्याचे माजी मंत्री आमदार दिलीप वळसे पाटील यांनी दिली.

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा


We treat He cure's
धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# १६ ऑगस्टला प्रकाश आरोटे यांच्या ‘माझी स्मरणगाथा’ चे प्रकाशन

## अकोलेच्या इतिहासाला मिळणार नवे शब्दरूप






युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले- अकोले तालुक्याच्या ऐतिहासिक, सामाजिक आणि सांस्कृतिक प्रवासाचा वेध घेणारे ज्येष्ठ पत्रकार प्रकाश आरोटे लिखित ‘माझी स्मरणगाथा’ या बहुप्रतीक्षित पुस्तकाचा प्रकाशन सोहळा रविवार, दि. १६ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता अकोले महाविद्यालयातील के. बी. दादा सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न होणार आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. संदीप सांगळे,अकोले विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ.किरण लहामटे यांच्या शुभहस्ते पुस्तकाचे प्रकाशन होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चपराक प्रकाशन, पुणेचे प्रकाशक धनश्याम पाटील विराजमान राहतील.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्य पतित पावन संघटनेचे प्रांताध्यक्ष,थोर विचारवंत प्रा.एस. झेड.देशमुख आणि माजी आमदार वैभव पिचड, अभिनव शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मधुकर नवले, युवा नेते अमित भांगरे, अगस्ति एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष सतिश नाईकवाडी, सेवानिवृत्त अपर पोलीस अधीक्षक भाऊसाहेब गायकर आणि शिक्षण तज्ज्ञ , लेखक , ज्येष्ठ पत्रकार संदीप वाकचौरे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.

‘माझी स्मरणगाथा’ हे पुस्तक अकोले तालुक्याच्या इतिहास, समाजजीवन, संस्कृती आणि परिवर्तनाचा अभ्यासपूर्ण मागोवा घेणारे महत्त्वपूर्ण दस्तऐवज ठरणार असून इतिहासप्रेमी, साहित्यप्रेमी आणि संशोधकांसाठी ते एक मौल्यवान संदर्भग्रंथ ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. या पुस्तक प्रकाशन सोहळ्यास साहित्य, पत्रकारिता, शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांसह नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन निमंत्रक रुपाली आरोटे, ज्येष्ठ पत्रकार प्रकाश आरोटे, इंजि. अक्षय आरोटे, डॉ. श्रावणी आरोटे, नमामी आणि य:मी यांनी केले आहे.

# संगमनेरमध्ये अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव

## ज्येष्ठ साहित्यीक विश्वास पाटील यांचे व्याख्यान

संगमनेर (प्रतिनिधी) : साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त संगमनेर येथे भव्य जयंती उत्सव व गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार, १६ ऑगस्ट २०२६ रोजी मालपाणी लॉन्स, संगमनेर येथे हा सोहळा होणार असून, विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा तसेच गुणवंत विद्यार्थी व समाजभूषणांचा सन्मान करण्यात येणार आहे.

सत्यशोधक साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे प्रबोधन मंच, संगमनेर यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात सन २०२५-२६ मध्ये दहावी व बारावीच्या परीक्षेत ७० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या अहिल्यानगर जिल्ह्यातील मातंग समाजातील विद्यार्थ्यांचा गुणगौरव व सत्कार करण्यात येणार आहे. या विद्यार्थ्यांचा सन्मान मातंग समाजातील पहिल्या आयएएस कु. प्रेरणा कैलास खवळे यांच्या शुभहस्ते करण्यात येणार आहे.



कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते, प्रसिद्ध साहित्यिक व ‘पानिपत’कार तसेच अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील हे ‘परिवर्तन चळवळीतील साहित्यिक सत्यशोधक लोकशाहीर अण्णाभाऊ साठे’ या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. त्यामुळे अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचा सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीशी असलेला संबंध आणि त्यांच्या विचारांची आजच्या काळातील उपयुक्तता यावर विचारमंथन होणार आहे. या सोहळ्यास माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, विधान परिषद सदस्य आ. सत्यजित तांबे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी अनुसूचित जाती विभागाचे प्रदेशाध्यक्ष अनिरुद्ध वनकर, संगमनेर नगरपालिकेच्या नगराध्यक्षा डॉ. सौ. मैथिलीताई तांबे तसेच संगमनेर तालुका युवक काँग्रेसच्या अध्यक्षा डॉ. जयश्रीताई थोरात यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

यावेळी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणारे उच्चपदस्थ अधिकारी, गुणवंत विद्यार्थी तसेच समाजासाठी योगदान देणाऱ्या ज्येष्ठ मान्यवरांना समाजभूषण पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात येणार आहे. मातंग समाजाला शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक आणि राजकीय प्रवाहात प्रभावीपणे आणण्यासाठी उपवर्गीकरणाची नितांत गरज असल्याचा संदेशही या कार्यक्रमातून देण्यात येणार आहे. ‘उठ मातंगा, जागा हो; संघर्षाचा धागा हो’ या घोषवाक्याने समाजातील शैक्षणिक व सामाजिक जागृतीला चालना देण्याचा आयोजकांचा प्रयत्न आहे. गुणवंत विद्यार्थी सत्कारासाठी पात्र विद्यार्थ्यांनी आपले मार्कशीट व संबंधित माहिती आयोजकांकडे सादर करावी. नोंदणीसाठी विजय खरात : ८६०५७५१०३२ या क्रमांकावर संपर्क साधावा.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संतोष गायकवाड, दत्तात्रय औचिते, दीपक खरात, इंजि. संकेत आल्हाट, सोनू गायकवाड, विजय खरात, स्वप्निल चव्हाण, रवी शिंदे, अजित आल्हाट, विशाल खरात, मधुकर पवार आदी प्रयत्नशील आहेत.

# जिल्ह्यात रोखले २०० बालविवाह

अहिल्यानगर -

महिला व बालविकास विभाग, पोलिस प्रशासन आणि बालसंरक्षण समितीसह स्वयंसेवी संस्थांच्या एप्रिल २०२५ ते ऑगस्ट २०२६ या कालावधीत जिल्ह्यात सुमारे २०० हून अधिक बालविवाह यशस्वीरीत्या रोखले आहेत.एकूण १५५ कारवायांपैकी ७ प्रकरणांमध्ये नियमांचे उल्लंघन झाल्याचे आढळल्याने संबंधित पालक व आयोजकांवर गुन्हे नोंदवले आहेत. उर्वरित प्रकरणांमध्ये प्रशासनाने वेळीच हस्तक्षेप करून समुपदेशनाद्वारे विवाह रोखले. मे २०२६ मधील लग्नाच्या मुहूर्ताच्या काळात विशेष मोहीम राबवून एकाच दिवसात ९ ते ११ बालविवाह रोखत पालकांना नोटिसा बजावल्या होत्या. तालुकाहाय आकडेवारीनुसार, अहिल्यानगर आणि पाथर्डी तालुक्यात सर्वाधिक प्रत्येकी १९ बालविवाह रोखण्यात आले. श्रीगोंदा (१७), शेवगाव (१५), कर्जत (१४), राहुरी (१२) आणि नेवासा (११) या तालुक्यांचा क्रमांक लागतो. संगमनेर, पारनेर, राहाता तालुक्यांत प्रत्येकी ९, कोपरगाव ७,जामखेड व अकोले तालुक्यात प्रत्येकी ६, श्रीरामपूर तालुक्यात २ कारवाया करण्यात आल्या.

# संतांनी देवाला समाजात बघीतले, त्यांचीच पुण्यतिथी होते !

## संत सावता माळी : प्रपंचात राहून परमार्थ साधणारा कर्मयोगी संत

ज्यांना जगण्याचे तथ्य कळाले, त्यांचीच पुण्यतिथी होते. शेकडो वर्षे अज्ञानाच्या अंधारात राहिलेल्या समाजाला उद्धाराचा मार्ग दाखविण्यासाठी महाराष्ट्राच्या भूमीत वारकरी संप्रदायाचा आणि भक्तीचा मार्ग उदयाला आला. संत ज्ञानेश्वर आणि संत नामदेव यांनी अठरापगड जातींना एकत्र आणत प्रत्येक समाजघटकातून संतत्व निर्माण केले आणि महाराष्ट्राच्या धार्मिक, सामाजिक व पारमार्थिक जीवनात एक मोठे क्रांतिकार्य घडवून आणले. संत चोखामेळा, संत गोरा कुंभार, संत सावता माळी आणि संत सेना न्हावी हे या क्रांतिकार्याचेच फलित होय.



या संतपरंपरेत संत सावता माळी यांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. सोलापूर जिल्ह्यातील अरण-भेंडी हे त्यांचे गाव. पंढरपूरपासून अवघ्या काही अंतरावर असलेल्या या भूमीत त्यांनी आपल्या प्रपंचालाच परमार्थाची उंची दिली. शेती करताना त्यांनी भक्तीचे मळे फुलविले आणि सात्त्विक भावाची फुले भगवंताच्या चरणी अर्पण केली. त्या भक्तीचा सुगंध आजही महाराष्ट्राच्या जनमानसात दरवळत आहे.

संत सावता माळी यांचे जीवन सांगते की, परमार्थासाठी प्रपंचाचा त्याग करण्याची गरज नाही. आपली दैनंदिन कर्तव्ये प्रामाणिकपणे पार पाडत असतानाही ईश्वराची भक्ती करता येते. कर्मातच ईश्वर पाहता येतो आणि संसारालाच साधनेचे माध्यम बनविता येते. सावता माळी सतत काळ्या आईच्या सेवेत रमलेले असत. मोटेचे स्वच्छ पाणी मळ्यातून वाहत असे. हिरवीगार रोपे डोलत असताना मोट हाकता हाकता त्यांच्या मुखातून अभंग उमटत. आपल्या मळ्याचा खरा मालक विठ्ठलच आहे, ही भावना त्यांच्या अंतःकरणात दृढ होती.

त्यांच्या या भक्तिभावाचे दर्शन घडविणारा प्रसिद्ध अभंग म्हणजे-

कांदा मुळा भाजी। अवघी विठाबाई माझी।
लसूण मिरची कोथिंबिरी। अवघा झाला माझा हरी।।
मोट नाडा विहीर दोरी। अवघी व्यापिली पंढरी।।
सावता म्हणे केला मळा। विठ्ठला पायी गोविला गळा।।

या अभंगातून सावता माळी यांनी आपल्या श्रमांना आणि शेतीला थेट विठ्ठलभक्तीशी जोडले. त्यांच्या दृष्टीने मळ्यातील प्रत्येक रोप, प्रत्येक थेंब पाणी आणि प्रत्येक कष्टाचा क्षण हा विठ्ठलसेवाच होता. पंढरीला न जाता पंढरी आपल्या मळ्यात आणली. विविध संतपरंपरांच्या संदर्भांनुसार सावता माळी पंढरपूरजवळ राहत असूनही स्वतः पंढरपूरला जाण्याऐवजी आपल्या घरी येणाऱ्या वारकऱ्यांची सेवा करीत. वारकऱ्यांना जेवण देणे, त्यांना विश्रांती देणे, त्यांची सेवा करणे हे त्यांचे नित्याचे काम होते. यामुळे त्यांच्या पत्नी जनाबाई कधी कधी नाराज होत. मात्र सावता माळी यांचा विठ्ठलावर एवढा दृढ विश्वास होता की ते म्हणत, एक दिवस स्वतः पांडुरंग आपल्याकडे येतील. आणि त्यांच्या भक्तीची हीच ताकद होती. त्यांच्या अंतःकरणातील ‘मी’पणाचे विकार त्यांनी भक्तीने घासून-पुसून स्वच्छ केले होते. एकदा संत नामदेव आणि संत ज्ञानेश्वर यांनी सावता माळी यांच्याकडे जाण्याचे ठरविले. त्यांच्यासोबत स्वतः विठ्ठलही सावता माळी यांच्या मळ्यात आले, अशी संतपरंपरेतील भावपूर्ण कथा सांगितली जाते. संत ज्ञानदेव, संत नामदेव आणि विठ्ठल स्वतः आपल्या मळ्यात आल्यामुळे सावता माळींचा मळा जणू पंढरीच बनून गेला.

भक्तीच्या या अनुभूतीतूनच त्यांच्या मुखातून अभंग उमटला. विठ्ठलाने निवांत जागेची इच्छा व्यक्त केली असता सावता माळी यांनी आपल्या विहिरीतील कोनाड्यातील जागा त्यांना दाखवली. भक्ताच्या प्रेमाने विठ्ठल तेथेच राहिले, अशी श्रद्धा आहे. म्हणूनच सावता माळी यांचा मळा म्हणजेच पंढरपूर आणि त्यांची शेती म्हणजेच विठ्ठलाची सेवा, अशी भक्तांची भावना झाली.

भक्तीची परंपरा आणि संसारातील विरक्ती- सावता माळी यांच्या घराण्यातच विठ्ठलभक्तीची परंपरा होती. त्यांचे वडील परसूबा आणि आई नागिताबाई हे विठ्ठलभक्त होते. त्यांच्याकडून मिळालेली भक्तीची परंपरा सावता माळी यांनी पुढे नेली. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात परोपकार, साधुत्व, भगवद्भक्ती आणि कर्तव्यनिष्ठा यांचा सुंदर संगम होता. संसारात राहूनही ते विरक्त होते. आई-वडिलांच्या देखत त्यांचा विवाह जनाबाई यांच्याशी झाला. पतीची भक्तीची वृत्ती पाहून जनाबाईही त्यांच्या आध्यात्मिक वाटचालीत सहभागी झाल्या. एकदा सावता माळी भजनात तल्लीन असताना पत्नीच्या माहेरची मंडळी पाहुणे म्हणून आली. भजनात इतके तल्लीन झाले होते की पाहुण्यांच्या स्वागताचे त्यांना भान राहिले नाही. त्यामुळे जनाबाई नाराज झाल्या. त्यावेळी सावता माळी यांनी आपली चूक मान्य केली आणि पत्नीला संसार व परमार्थ यांचा सुंदर समन्वय सांगितला-

प्रपंची असुनी परमार्थ साधावा।
वाचे आळवावा पांडुरंग।
उचनीच काही न पाहे सर्वथा।
घटका आणि पळ साधी उतावीळ।
वाऊगा तो काळ जाऊ नेदी।।
सावता म्हणे कांते जपे नामावळी।
हृदया कमळी पांडुरंग।।

हा संदेश आजच्या काळातही तितकाच महत्त्वाचा आहे. संसार सोडून नव्हे, तर संसाराच्या जबाबदाऱ्या पार पाडत परमार्थ साधता येतो, हे सावता माळी यांनी आपल्या आचरणातून सिद्ध केले.

दुःख-दैन्याच्या पलीकडे गेलेली भक्ती- संत सावता माळी यांच्या जीवनातही संसारातील चटके होते. कष्ट होते, दारिद्र्य होते; मात्र या सर्वांवर त्यांनी भगवंतावरील अनन्य श्रद्धेच्या बळावर मात केली.

ते म्हणतात-

ऐकावे विठ्ठल धुरे। विनंती माझी हो सत्वरे।
करी संसाराची बोहरी। इतके मागतो श्रीहरी।।
कष्ट करिता जन्म गेला। तुझा विसर पडला।।

त्यांनी संसारासाठी ऐहिक सुखांची मागणी केली नाही. माया, लोभ आणि मोहाच्या पलीकडे जाण्याचा प्रयत्न त्यांनी केला. त्यांच्या दृष्टीने संसार हा विठ्ठलाची सेवा करण्याचे साधन होता. त्यांच्या जीवनात ईश्वरावरची निष्ठा, मानवतेवरील प्रेम, तल्लीन भक्ती आणि मनःशांती यांचा अद्भुत संगम दिसतो.

माळियाचे वंशी सावता जन्मला

संत सावता माळी यांच्या महात्म्याचे वर्णन करताना संत एकनाथ म्हणतात-

माळियाचे वंशी सावता जन्मला।
पावन केला तो वंश त्याचा।।
त्याच सवे हरी खुरपू लागे अंगे।
धावुनी त्याच्या मागे काम करी।।
पितांबर कास खोचोनी माझारी।
सर्व काम करी निज संगे।।
एका जनार्दनी सावता तो धन्य।
तयाचे महिमान न कळे काही।।

या अभंगातून सावता माळी यांच्या भक्तीची उंची आणि त्यांच्या कर्मयोगाचे महत्त्व स्पष्ट होते. विठ्ठल स्वतः आपल्या भक्ताच्या श्रमात सहभागी होतो, ही भावना या संतपरंपरेचा केंद्रबिंदू आहे.

कर्म हाच ईश्वर - संत सावता माळी हे केवळ संत नव्हते, तर ते समाजप्रबोधन करणारे संत होते. कर्म हाच ईश्वर आहे, हा संदेश त्यांनी दिला. आपल्या व्यवसायाला भक्तीशी जोडताना ते म्हणतात-

आमची माळियाची जात। शेत लावू बागाईत।।

ईश्वरप्राप्तीसाठी संन्यास घेण्याची आवश्यकता नाही. तीर्थयात्रा, कर्मकांड किंवा बाह्य आडंबरापेक्षा अंतःकरणाची शुद्धता, नामस्मरण, सदाचार आणि प्रामाणिक कर्म यांना अधिक महत्त्व आहे, हा विचार त्यांनी जनसामान्यांपर्यंत पोहोचविला. मानवता, समता आणि बंधुभावाचा संदेश त्यांनी दिला. अंधश्रद्धा, कर्मठपणा आणि दांभिकतेवर त्यांनी निर्भीडपणे प्रहार केला. अंतःकरणाची शुद्धता, तत्त्वचिंतन, सदाचार, निर्भयता, नीतिमत्ता आणि सहिष्णुता या गुणांना त्यांनी विशेष महत्त्व दिले. अध्यात्म, भक्ती, आत्मबोध, लोकसंग्रह, कर्तव्य आणि सदाचार यांची सांगड भक्तीमार्गाशी घालणारा हा संत महाराष्ट्राच्या सामाजिक आणि आध्यात्मिक इतिहासातील एक महत्त्वाचा दीपस्तंभ आहे.

जगण्याचे तथ्य समजलेला संत -

शके ११७२ मध्ये जन्मलेले संत सावता माळी यांनी अल्पायुष्यात अत्यंत समृद्ध आध्यात्मिक जीवन जगले. वयाच्या सुमारे ४५व्या वर्षी त्यांनी देह ठेवला, अशी संतपरंपरेत मान्यता आहे. आषाढ वद्य चतुर्दशीच्या दिवशी, शके १२१७ मध्ये ते वैकुंठवासी झाले, अशी परंपरा सांगते. अरण-भेंडी येथे आजही त्यांची पुण्यतिथी भक्तिभावाने साजरी केली जाते.

**प्रा. शशांक गंधे, संगमनेर**
**मो. ९८९०१६३६४२**

# राजीव गांधी विद्यालयात आदिवासी संस्कृतीचा जागर



युवावार्ता (प्रतिनिधी)

निमज -: जागतिक आदिवासी दिन आणि ऑगस्ट क्रांती दिनाचे औचित्य साधून निमज येथील भारतरत्न राजीव गांधी विद्यालयात विविध सांस्कृतिक व उत्साही कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमातून आदिवासी संस्कृतीचे जतन, संवर्धन आणि नव्या पिढीपर्यंत तिचा वारसा पोहोचविण्याचा संदेश देतानाच देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात योगदान देणाऱ्या क्रांतीवीरांना अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात जननायक बिरसा मुंडा आणि क्रांतिकारक राघोजी भांगरे यांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आली. उपस्थितांनी या महान क्रांतीवीरांच्या स्मृतींना अभिवादन केले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. यावर्षी प्रसिद्ध तारपा वादक भिकल्या धिंडा यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर इयत्ता आठवीच्या विद्यार्थिनींनी आदिवासी संस्कृतीचे वैशिष्ट्य असलेले मनमोहक तारपा नृत्य सादर केले. पारंपरिक वेशभूषा, तालबद्ध हालचाली आणि आदिवासी संस्कृतीची वैशिष्ट्यपूर्ण झलक यामुळे या नृत्याने विशेष दाद मिळवली. तसेच इयत्ता पाचवी ते नववीच्या विद्यार्थिनींनी विविध लयबद्ध आदिवासी लोकनृत्ये सादर करून कार्यक्रमात उत्साहाचे वातावरण निर्माण केले. विद्यार्थिनींच्या आकर्षक नृत्याविष्कारातून आदिवासी समाजाची समृद्ध लोकपरंपरा, कला आणि संस्कृतीचे दर्शन घडले.

विशेष म्हणजे, या सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण शाळेच्या प्रांगणापुरते मर्यादित न ठेवता निमज गावातील मुख्य दोन चौकांमध्येही करण्यात आले. विद्यार्थिनींनी सादर केलेल्या पारंपरिक आदिवासी नृत्यांना ग्रामस्थांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. गावातील नागरिकांनी विद्यार्थिनींच्या कलाविष्काराचे कौतुक करत टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचा उत्साह वाढविला. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आपल्या संस्कृतीविषयी अभिमान निर्माण होण्यासोबतच क्रांतीवीरांच्या कार्याची ओळख आणि त्यांच्या विचारांची प्रेरणा मिळाली. शिक्षणासोबतच संस्कृती, इतिहास आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याचा हा उपक्रम ठरला.

# संपादकीय...

## जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन

## विक्रम साराभाई : भारताच्या अंतराळ भरारीचे शिल्पकार

भारत आज अंतराळ विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात जगातील आघाडीच्या देशांमध्ये स्थान मिळवत आहे. चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर यशस्वीपणे पोहोचणारा भारत, मंगळाच्या कक्षेत यान पाठवणारा भारत, अवकाशात विविध उपग्रहांची यशस्वी मालिका प्रक्षेपित करणारा भारत आणि भविष्यात मानवाला अंतराळात पाठविण्याचे स्वप्न पाहणारा भारत... या भारताच्या अंतराळ यशामागे ज्या महान व्यक्तीची दूरदृष्टी, वैज्ञानिक विचार आणि अथक परिश्रम आहेत, त्यांचे नाव म्हणजे डॉ. विक्रम अंबालाल साराभाई. भारतीय अंतराळ संशोधनाचे पितामह आणि आधुनिक भारताच्या अंतराळ युगाचे शिल्पकार म्हणून डॉ. विक्रम साराभाई यांची ओळख आहे. त्यांचा जन्म १२ ऑगस्ट १९१९ रोजी अहमदाबाद येथे एका समृद्ध आणि प्रतिष्ठित कुटुंबात झाला. त्यांचे वडील प्रसिद्ध उद्योगपती होते. त्यांच्या घरी देशातील अनेक दिग्गज नेत्यांची आणि विचारवंतांची ये-जा असायची. त्यामुळे विक्रम साराभाई यांच्यासमोर राजकारण आणि उद्योगविश्वाचे पर्याय सहज उपलब्ध होते. मात्र, त्यांचे मन विज्ञानात रमले होते. लहानपणापासूनच त्यांना गणित आणि विज्ञानाची विशेष आवड होती. उच्च शिक्षणासाठी ते इंग्लंडला गेले आणि केंब्रिज विद्यापीठात त्यांनी विज्ञानाचे शिक्षण घेतले. भारतात परतल्यानंतर त्यांनी बंगळुरू येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समध्ये नोबेल पुरस्कार विजेते महान शास्त्रज्ञ सर सी. व्ही. रमण यांच्या मार्गदर्शनाखाली वैश्विक किरणांवर संशोधन केले. पुढे १९४५ मध्ये ते पुन्हा ब्रिटनला गेले आणि वैश्विक किरणांशी संबंधित संशोधनावर पीएच.डी. मिळवली. भारताच्या वैज्ञानिक विकासासाठी स्वतंत्र संशोधन संस्था असावी, या विचारातून त्यांनी ११ नोव्हेंबर १९४७ रोजी अहमदाबाद येथे फिजिकल रिसर्च लॅबोरेटरीची (पीआरएल) स्थापना केली. ही संस्था पुढे भारताच्या अंतराळ संशोधनाची पायाभरणी करणारे महत्त्वाचे केंद्र ठरली. विक्रम साराभाई यांचे अंतराळ संशोधनाचे स्वप्न केवळ कल्पनेपुरते मर्यादित नव्हते. भारतासारख्या विकसनशील देशाने अंतराळ तंत्रज्ञानाचा उपयोग केवळ प्रतिष्ठेसाठी नव्हे, तर सामान्य माणसाच्या जीवनमानात सुधारणा करण्यासाठी करावा, असा त्यांचा ठाम विचार होता.

या विचारातूनच भारताच्या अंतराळ कार्यक्रमाला दिशा मिळाली. केरळमधील थुंबा हे ठिकाण रॉकेट प्रक्षेपणासाठी अत्यंत महत्त्वाचे होते. हे ठिकाण चुंबकीय भूमध्यरेषेच्या जवळ असल्याने वैज्ञानिक दृष्टिकोनातून तेथे प्रक्षेपण केंद्र उभारणे उपयुक्त होते. मात्र, त्या परिसरात घरे आणि एक चर्च होते. स्थानिक नागरिकांना आपली घरे आणि जागा सोडणे सहज शक्य नव्हते. विक्रम साराभाई यांनी सरकारी अधिकाराचा वापर करून लोकांना हटविण्याऐवजी स्वतः त्यांची भेट घेतली. त्यांनी या जागेचे वैज्ञानिक महत्त्व आणि भारताच्या भविष्यातील अंतराळ कार्यक्रमाचे महत्त्व स्थानिक नागरिकांना समजावून सांगितले. त्यांच्या नम्रतेने, संवादकौशल्याने आणि देशाच्या भविष्यासाठी असलेल्या तळमळीने स्थानिक नागरिक प्रभावित झाले. अखेर त्यांनी जागा देण्यास सहमती दर्शवली. याच ठिकाणी भारताच्या रॉकेट प्रक्षेपण कार्यक्रमाला सुरुवात झाली. २१ नोव्हेंबर १९६३ रोजी थुंबा येथून भारताचे पहिले प्रायोगिक रॉकेट प्रक्षेपित करण्यात आले. ही घटना भारतीय अंतराळ कार्यक्रमाच्या इतिहासातील महत्त्वाचा टप्पा ठरली. अंतराळ संशोधनासाठी देशात प्रशिक्षित वैज्ञानिक आणि तज्ज्ञांची कमतरता होती. अनेक भारतीय संशोधक परदेशात कार्यरत होते. विक्रम साराभाई यांनी त्यांना भारतात परतण्याचे आवाहन केले. त्यांचा संदेश अत्यंत साधा पण हृदयाला भिडणारा होता-भारताकडे कदाचित परदेशासारख्या अत्याधुनिक सुविधा नसतील; मात्र देश उभारण्याची संधी आणि मातृभूमीची सेवा करण्याचे समाधान नक्कीच मिळेल. त्यांच्या या आवाहनाला अनेक तरुण वैज्ञानिकांनी प्रतिसाद दिला. वसंत गोवारीकर यांच्यासारखे अनेक प्रतिभावान वैज्ञानिक भारतात परतले. साराभाई यांनी या वैज्ञानिकांना एकत्र आणून एक सक्षम संशोधन टीम उभी केली. मर्यादित साधनसामग्री, कमी निधी आणि अनेक अडचणी असतानाही या टीमने दिवस-रात्र मेहनत घेतली. याच प्रयत्नांतून पुढे भारताच्या उपग्रह आणि प्रक्षेपण तंत्रज्ञानाचा पाया मजबूत झाला. भारताचा पहिला उपग्रह 'आर्यभट्ट' १९७५ मध्ये अंतराळात झेपावला. त्या वेळी विक्रम साराभाई हयात नव्हते; मात्र त्यांनी पेरलेल्या वैज्ञानिक विचारांच्या आणि संस्थात्मक पायाभरणीच्या बीजातूनच हे यश साकार झाले. भारतीय अंतराळ संशोधनाच्या संस्थात्मक विकासात साराभाई यांचे योगदान अनन्यसाधारण होते. त्यांच्या प्रयत्नांतून भारतीय अंतराळ कार्यक्रमाला संघटित स्वरूप मिळाले आणि पुढे भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात इस्रो एक शक्तिशाली वैज्ञानिक संस्था म्हणून विकसित झाली.

# अमृतवाहिनीला ए. डी. आर सेंटरची मान्यता - डॉ. कलैसेल्वन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - थोर स्वातंत्र्यसेनानी सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण मिळावे याकरता अमृतवाहिनी शिक्षण संस्थेची १९७८ मध्ये स्थापना केली. संस्थेतील गुणवत्तापूर्ण शिक्षणामुळे अनेक माजी विद्यार्थी देशात व जगात विविध ठिकाणी अत्यंत यशस्वीपणे मोठ्या पदावर कार्यरत असून संस्थेसाठी हे अभिमानास्पद असल्याचे प्रतिपादन राज्याचे माजी महसूल व शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले आहे तर महाराष्ट्रात प्रथमच अमृतवाहिनी इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीला ए.डी.आर सेंटर दिले असल्याचे केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाचे सचिव डॉ.व्ही.कलाईसेल्वन यांनी केले आहे.

अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेच्या वतीने ४९ व्या स्थापना दिनाच्या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर मा.महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाचे सचिव डॉ.व्ही.कलाईसेल्वन, इशा थेरपूटिक्स न्यू जर्सी अमेरिकेचे संचालक डॉ. मनोज जाधव, ओराह न्यूट्रिकेमचे संचालक डॉ.रोहित डूबे पाटील, लक्ष्मणराव कुटे, कार्यकारी विश्वस्त सौ. शरयूताई देशमुख, डॉ.जयश्रीताई थोरात, सौ. कविताताई डूबे, तुळशीनाथ भोर, विलास वर्पे, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, व्यवस्थापक प्रा. व्ही. बी. धुमाळ, डायरेक्टर अकॅडमी डॉ. जे. बी. गुरव, प्राचार्य डॉ. प्रसाद बाविस्कर, कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. मच्छिंद्र चव्हाण, इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. मनोज शिरभाते, डॉ. बाबासाहेब लोंढे, जे. बी. सेठी, अंजली कन्नावार, आशिष कुमार, विलास भाटे, प्रा.विजय वाघे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.यावेळी अमृतवाहिनी तंत्रनिकेतनच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या रोबोटिकने आलेल्या सर्व मान्यवरांचे स्वागत केले.

यावेळी बोलताना माजी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी सह्याद्री संस्थेची स्थापना केली. यानंतर आपल्या विद्यार्थ्यांना उच्चतंत्र शिक्षण मिळावे याकरता १९७८ मध्ये अमृतवाहिनी शिक्षण संस्थेची स्थापना केली. या संस्थेसाठी स्वर्गीय वसंतदादा पाटील यशवंतराव चव्हाण यांनी मदत केली आणि म्हणून त्यांच्या स्मरणार्थ आपण वसंततीर्थ व यशवंततिर्थ निर्माण केले. अमृतवाहिनी संस्थेने सातत्याने गुणवत्ता पूर्ण वाटचाल केली आहे. संस्थेच्या विविध विभागांमधील अनेक विद्यार्थी देशात व विदेशात मोठ्या पदांवर कार्यरत आहे. तालुक्यामधील जवळजवळ प्रत्येक कुटुंबामधून इंजिनियर झाले असून त्यामुळे कुटुंबांमध्ये समृद्धी आली आहे. तालुक्याच्या विकासाबरोबर शैक्षणिक क्रांती झाली असून हे तालुक्याच्या समृद्धीचे प्रतीक आहे. यापुढील काळातही नावलौकिका प्रमाणे गुणवत्ता टिकवण्यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करावे असे आवाहन त्यांनी केले. तर केंद्रीय सचिव डॉ.व्ही.कलाईसेल्वन म्हणाले की, माजी शिक्षणमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली ग्रामीण भागात असूनही अत्यंत चांगल्या सुविधा या संस्थेने विद्यार्थ्यांना दिल्या आहे.आरोग्याचे महत्त्व मोठे असून अनेक औषधांचे इफेक्ट आणि साईड इफेक्ट माणसावर पडत असतात परंतु ज्या औषध किंवा गोळ्यांमुळे साईड इफेक्ट होतात त्याची तात्काळ तक्रार नोंदणी आता अमृतवाहिनी इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी कॉलेजमध्ये करता येणार आहे. याचबरोबर मेडिकल उपकरणांच्या बाबतीत काही तक्रारी असल्या तर आपल्याला त्या नोंदवता येणार आहे.

# मालपाणी विद्यालयात रंगला एक हजार विद्यार्थ्यांचा भव्य वारकरी रिंगण सोहळा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - येथील मालपाणी विद्यालयात कामिका एकादशीच्या पूर्वसंध्येला भक्तिमय वातावरणात एक हजार विद्यार्थ्यांचा भव्य वारकरी दिंडी व रिंगण सोहळा उत्साहात संपन्न झाला. विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर सहकाऱ्यांसह विद्यार्थी-विद्यार्थिनी या सोहळ्यात सहभागी झाले होते. विठ्ठलनामाचा गजर, टाळ-मृदुंगाचा निनाद, भजन, कीर्तन, प्रवचन आणि विविध भक्तिगीतांवरील नृत्यांनी संपूर्ण विद्यालय परिसर विठ्ठलमय झाला होता. या सोहळ्यास शारदा शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा सुवर्णाताई मालपाणी, सचिव सतीश लाहोटी, पालक प्रतिनिधी शिवाली सूर्यवंशी, व्य. समिती सदस्य संजय कर्पे, मुख्याध्यापक उत्तम एरंडे, तारा आसावा आदी मान्यवर उपस्थित होते.

या सोहळ्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर सहकारी तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी वारकरी वेशभूषेत सहभागी झाले होते. डोक्यावर फेटे, हातात टाळ, गळ्यात तुळशीच्या माळा आणि मुखी विठ्ठलनामाचा गजर अशा भक्तिमय रूपातील शिक्षक आणि विद्यार्थ्यांमुळे संपूर्ण विद्यालय परिसराला जणू पंढरपूरच्या वारीचे स्वरूप प्राप्त झाले होते.

तुळशी वृंदावन व मंगल कलश घेऊन सहभागी झालेल्या शिक्षिका व विद्यार्थिनींनी या भक्तिमय सोहळ्याची शोभा अधिकच वाढवली. विविध संतांच्या वेशभूषेतील विद्यार्थी तसेच विठ्ठल-रखुमाईच्या वेशातील विद्यार्थ्यांनी या सोहळ्याचे विशेष आकर्षण ठरले. त्यांच्या रूपातून संतपरंपरा, वारकरी संस्कृती आणि भक्तीचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक मा. उत्तम एरंडे यांनी केले. आपल्या प्रास्ताविकातून त्यांनी वारी ही केवळ पंढरीकडे जाणारी वाटचाल नाही; ती संस्कारांकडे, समतेकडे, एकतेकडे आणि माणुसकीकडे नेणारी वाट आहे. विठ्ठलनामाच्या गजरात आजच्या पिढीला संतांचे विचार आणि वारकरी संस्कृतीची ओळख करून देणे, हाच या रिंगण सोहळ्याचा खरा संदेश आहे. असे सांगितले . यावेळी कु. स्वरा नाईकवाडी आणि कु. पूर्वा भडांगे यांनी विठ्ठलनाम, वारकरी परंपरा आणि भक्तीची महती सांगणारे सुंदर प्रवचन सादर केले. विठ्ठल गीतांवर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध नृत्यांनी कार्यक्रमात विशेष रंगत आणली. टाळ नृत्य, लेझीम नृत्य, भक्तीपर नृत्य यांसह विद्यार्थ्यांनी फेर धरत फुगड्यांचा आनंद घेतला. त्यांच्या उत्स्फूर्त सहभागाने संपूर्ण वातावरणात चैतन्य निर्माण झाले.

यानंतर विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल या नामघोषात टाळ-मृदुंगाच्या तालावर विद्यार्थी-विद्यार्थिनींनी पावली नृत्य करत भव्य गोल रिंगण साकारले. टाळांच्या निनादात, मृदुंगाच्या तालात आणि विठ्ठलनामाच्या गजरात साकारलेले हे रिंगण उपस्थितांसाठी भक्तीचा अविस्मरणीय अनुभव ठरले.


॥ जनसेवा हिच ईश्वर सेवा ॥

**संगमनेर नगरपरिषद, संगमनेर**

संगमनेर – ४२२६०५, जि. अहमदनगर दूरध्वनी (०२४२५) २२५३०८, २२५१६५, २२७२३८

जा.क्रं. सं.न.प./भांडार/२०२६/१९७८ दिनांक – ०७/०८/२०२६

**जाहीर निविदा सुचना सन२०२६/२७**

संगमनेर नगरपरिषदेची न. प. निधी अंतर्गत खाली काम करणेकरिता शासनाच्या योग्य त्या नोंदणीकृत मक्तेदाराकडून द्वि-लिफाफा पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.नं. | कामाचे नाव | बयाणा रक्कम | निविदा फार्म फी |
|---|---|---|---|
| १ | संगमनेर नगरपरिषदेच्या प्राथमिक शाळेतील इयत्ता ५ वी ते ७ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाव्यतिरिक्त उपयुक्त पुस्तके खरेदी करणे बाबत | १,००० /- | १००/- |
| निविदा सादर करण्याचा कालावधी दिनांक १०/०८/२०२६ ते दिनांक १८/०८/२०२६ रोजी सयांकाळी ५.०० पर्यंत | | | |

सही
(दयानंद गोरे)
मुख्याधिकारी
संगमनेर नगरपरिषद, संगमनेर

सही
(डॉ. मैथिली तांबे)
नगराध्यक्ष
संगमनेर नगरपरिषद, संगमनेर



**CHANGE IN NAME**

I, SHAIKH MUSTAFARAZA ZUBAIRUDDIN, residing at Raza Colony, Behind Kamal Petrol Pump, Bharat Nagar, Sangamner, Ahmadnagar, Maharashtra – 422605, have changed my name to MUSTAFA RAZA ZUBAIRUDDIN SHAIKH.
Old Name: Shaikh Mustafaraza Zubairuddin
New Name: Mustafa Raza Zubairuddin Shaikh

**SUBSCRIBE DAINIK YUVAVARTA YOUTUBE CHANNEL**

**पाहिजेत**
श्री गणेश डिस्ट्रीब्यूटर्स्
श्री गणेश टायर्स
श्री गणेश ऑइल सेंटर
या फर्मसाठी
अकाऊंटंट - 2 जागा
पुरूष - टॅली आणि एक्सेलचे ज्ञान अवश्यक
कामाचा अनुभव आवश्यक
८९९९८६२७५९

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME
TAHSIN MOHD ALI BORA
NEW NAME AS
TEHSEEN ABDULKADAR VOHARA
ADD - KURAN ROAD , GALLI NO 13 SANGAMNER
TAL - SANGAMNER
DIST - AHMEDNAGAR

**त्वरित भरती आजच संधीचा लाभ घ्या**
सर्व्हिस अॅडव्हायझर – 01 जागा
शैक्षणिक पात्रता :- ऑटोमोबाईल किंवा मेकॅनिकल डिप्लोमा
अनुभव :- फ्रेशर किंवा कोणत्याही ऑटोमोबाईल शोरूममध्ये १ वर्षाचा अनुभव असलेले उमेदवार अर्ज करू शकतात.
स्पेअर पार्ट्स बिलिंग – 01 जागा
कोणत्याही ऑटोमोबाईल शोरूममध्ये स्पेअर पार्ट्स बिलिंगचा किमान १ वर्षाचा अनुभव आवश्यक.
इच्छुक उमेदवारांनी त्वरित संपर्क साधावा.
पत्ता - घुलेवाडी ता. संगमनेर, जि. अ.नगर
मो. ९४२२७३५५६४

**पाहिजेत**
एक पुरुष कर्मचारी/मुलगा
पात्रता - लिहिता वाचता येणे आवश्यक
श्री विश्वगंध आयुर्वेद हॉस्पिटल
नवीन नगर रोड संगमनेर
– संपर्क –
7972999316

**फ्लॅट विकणे आहे**
2 BHK फ्लॅट विकणे आहे
नवीन बांधकाम, स्वतंत्र पार्किंगसह
ठिकाण: वृंदावन हाईट्स, चंद्रशेखर चौक, संगमनेर
– संपर्क –
8788945208
8208223721









**फॅकल्टी पाहिजे**
अगस्ती अकॅडमी संगमनेर
ऑनलाईन / ऑफलाईन अभ्यासक्रम
पशुधन पर्यवेक्षक भरती कोर्स
पशुवैद्यकीय विज्ञानातील पदविका (Diploma) किंवा पदवी (Degree) आवश्यक.
AMVI – 461 जागा MPSC (सहायक मोटार वाहन निरीक्षक)
यांत्रिक अभियांत्रिकी (Mechanical Engineering) मधील पदवी आवश्यक.
सरळसेवा बॅच २०२६ लवकरच सुरू
MPSC राज्यसेवा | गट B गट C | पोलिस भरती | बँकींग परिक्षा | सर्व स्पर्धा परिक्षा
अनुभवी व तज्ज्ञ शिक्षकवर्ग
सविस्तर मार्गदर्शन
नियमित टेस्ट, PYQ सराव व चर्चा
LIVE + Recorded बॅच सुविधा
वैयक्तिक मार्गदर्शन व शंका निरसन
पत्ता : नाशिक – पुणे हायवे, संचित बिल्डिंग, पहिला मजला महाराष्ट्र बँकेच्या वरती, संगमनेर - ४२२६०५
6005401510
9209645727

## दिनविशेष

२०२२: राजौरी आंतकी हल्ला, जम्मू काश्मीर — भारतातील जम्मू आणि काश्मीरमधील राजौरी येथील लष्करी तळावर झालेल्या हल्ल्यात तीन जवान शहीद झाले तर गोळीबारात दोन आतंकी हल्लेखोर ठार झाले.

२०१३: — डॉ. सुब्रम्हण्यम स्वामी यांच्या जनता पक्षाचे भारतीय जनता पक्षात विलीनीकरण झाले.

२००३: नाटो (NATO) — अफगाणिस्तानमधील शांती सैन्याची कमान हाती घेतली, ते नाटोचे ५४ वर्षांच्या इतिहासात युरोपबाहेरील पहिले मोठे ऑपरेशन आहे.

१९९९: परिमार्जन नेगी — राज्यस्तरीय जलद बुद्धीबळ स्पर्धेत सहा वर्षे वय असताना विजेतेपद जिंकणारा सर्वात छोटा खेळाडू ठरला.

१९९२: मॉल ऑफ अमेरिका — त्यावेळी अमेरिका देशातील सर्वात मोठा शॉपिंग मॉल ब्लूमिंग्टन, मिनेसोटा येथे उघडला.

१९७९: मोर्वी, गुजरात धरणफुटी दुर्घटना — किमान हजारो लोकांचे निधन.

## जन्म

१९६२: चार्ल्स सेसिल — इंग्रजी व्हिडिओ गेम डिझायनर,रेव्होल्यूशन सॉफ्टवेअरचे सह-संस्थापक

१९५४: यशपाल शर्मा — भारतीय क्रिकेटपटू

१९५०: स्टीव्ह वोजनियाक — ऍपल इन्क कंपनीचे सहसंस्थापक

१९५०: गेनाडी निकोनोव्ह — रशियन अभियंते, AN-94 रायफलचे रचनाकार (निधन: ५ फेब्रुवारी २००३ )

१९४४: फ्रेडरिक स्मिथ — अमेरिकन उद्योगपती, FedEx चे संस्थापक

१९४३: जनरल परवेझ मुशर्रफ — पाकिस्तानचे १० वे राष्ट्राध्यक्ष (निधन: ५ फेब्रुवारी २०२३

१९३९: जेम्स मंचम — सेशेल्स देशाचे पहिले अध्यक्ष (निधन: ८ जानेवारी २०१७ )

१९३७: पॅट्रिक जोसेफ मॅकगव्हर्न — अमेरिकन उद्योगपती, आंतरराष्ट्रीय डेटा ग्रुप कंपनीचे संस्थापक (निधन: १९ मार्च २०१४ )

१९३३: जेरी फेलवेल — लिबर्टी विद्यापीठाचे संस्थापक (निधन: १५ मे २००७ )

## मृत्यू

२०२२: जे. एस. ग्रेवाल — भारतीय इतिहासकार आणि शैक्षणिक प्रशासक, गुरु नानक देव विद्यापीठाचे कुलगुरू — पद्मश्री (जन्म: १९२७ )

२०२२: बाबुराव पाचर्णे — भारतीय राजकारणी, महाराष्ट्राचे आमदार

२०२२: शिमोगा सुबन्ना — भारतीय पार्श्वगायक — राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार (जन्म: १४ डिसेंबर १९३८ )

२०२२: रणजित पटनायक — भारतीय पटकथा लेखक

२०१८: व्ही.एस. नायपॉल — त्रिनिदादियन-इंग्रजी कादंबरीकार आणि निबंधकार — नोबेल पुरस्कार (जन्म: १७ ऑगस्ट १९३२ )

२०१३: जफर फटहॅली — भारतीय पक्षीशास्त्रज्ञ आणि लेखक (जन्म: १९ मार्च १९२० )

२००९: युनिस केनेडी श्रीव्हर — अमेरिकन कार्यकर्त्याने स्पेशल ऑलिम्पिकचे संस्थापक (जन्म: १० जुलै १९२१ )

२००३: अर्मांड बोरेल — स्विस गणितज्ञ (जन्म: २१ मे १९२३ )

२०००: पी. जयराज — भारतीय अभिनेते — दादासाहेब फाळके पुरस्कार (जन्म: २८ सप्टेंबर १९०९ )




## दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

**०९ ऑगस्ट**

## सुब्रमण्यम स्वामी यांच्या जनता पक्षाचे भाजपमध्ये विलीनीकरण



२०१३ हे भारतीय राजकारणातील महत्त्वाचे वर्ष ठरले. आगामी २०१४ च्या लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर विविध राजकीय पक्ष आणि नेते आपापली राजकीय समीकरणे मजबूत करण्याच्या प्रयत्नात होते. याच काळात डॉ. सुब्रमण्यम स्वामी यांच्या नेतृत्वाखालील जनता पक्षाचे भारतीय जनता पक्षात (भाजप) विलीनीकरण झाले. ११ ऑगस्ट २०१३ रोजी या विलीनीकरणाची अधिकृत घोषणा करण्यात आली.नवी दिल्ली येथे भाजपचे तत्कालीन राष्ट्रीय अध्यक्ष राजनाथ सिंह यांच्या उपस्थितीत ही घोषणा झाली. या वेळी राज्यसभेतील तत्कालीन विरोधी पक्षनेते अरुण जेटली आणि भाजपचे माजी अध्यक्ष नितीन गडकरी यांचीही उपस्थिती होती. राजनाथ सिंह यांनी जनता पक्षाचे भाजपमध्ये स्वागत करताना या विलीनीकरणामुळे भाजपला बळ मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.डॉ. सुब्रमण्यम स्वामी हे भारतीय राजकारणातील अभ्यासू आणि आक्रमक नेते म्हणून ओळखले जात होते. अर्थव्यवस्था, कायदा, भ्रष्टाचारविरोधी भूमिका आणि राष्ट्रीय राजकारणातील विविध विषयांवर त्यांनी सातत्याने भूमिका मांडली होती. २०१३ मध्ये भाजपमध्ये विलीन होण्यापूर्वी त्यांनी भाजपचे तत्कालीन नेते नरेंद्र मोदी यांचीही भेट घेतली होती. त्या वेळी स्वामी यांनी आपली विचारसरणी भाजपशी सुसंगत असल्याचे सांगत पक्षविलीनीकरणासाठी तयारी दर्शवली होती.विलीनीकरणाच्या वेळी देशासमोरील आव्हानांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय एकता आणि राष्ट्रहितासाठी एकत्र येणे आवश्यक असल्याचे स्वामी यांनी म्हटले होते. आगामी लोकसभा निवडणुकीपूर्वी भाजपची संघटनात्मक ताकद वाढवण्याच्या दृष्टीने हे पाऊल महत्त्वाचे मानले गेले.या विलीनीकरणामुळे जनता पक्षाचा स्वतंत्र राजकीय प्रवास संपुष्टात आला आणि डॉ. स्वामी भाजपच्या राजकीय प्रवाहात सहभागी झाले. पुढील काळात त्यांनी राष्ट्रीय राजकारणात भाजपशी संबंधित महत्त्वाच्या विषयांवर आपली भूमिका मांडत सक्रिय सहभाग कायम ठेवला. २०१३ मधील हे विलीनीकरण आगामी २०१४ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी भाजपच्या व्यापक राजकीय एकत्रीकरणातील एक महत्त्वाचा टप्पा ठरले.

## रणजित पटनायक — भारतीय पटकथालेखक

**जन्मदिन विशेष**

रणजित पटनायक हे ओडिया चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध पटकथालेखक, संवादलेखक आणि नाटककार म्हणून ओळखले जात होते. आपल्या प्रभावी लेखनशैलीच्या माध्यमातून त्यांनी ओडिया चित्रपट, दूरदर्शन आणि रंगभूमी या क्षेत्रांमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या लेखनात मनोरंजनासोबतच मानवी भावना, सामाजिक वास्तव, कौटुंबिक नाती आणि जीवनातील संघर्ष यांचे प्रभावी चित्रण आढळत असे.पटनायक यांनी आपल्या कारकिर्दीत अनेक ओडिया चित्रपटांसाठी पटकथा आणि संवाद लिहिले. 'सुंदरगड रा सलमान खान', 'प्रेमरे प्रेमरे', 'मुं एका तुमरा', 'अशोक सम्राट', 'परिबेनी केहि अलग करी', 'परशुराम', 'मॅट्रिक फेल', 'राजा झिया साथे हेइगला भाबा', 'समथिंग समथिंग' यांसारख्या चित्रपटांशी त्यांचे नाव जोडले गेले. त्यांच्या लेखनामुळे चित्रपटांतील कथा आणि व्यक्तिरेखांना अधिक प्रभावी अभिव्यक्ती मिळाली.पटकथालेखनाबरोबरच रणजित पटनायक यांनी संवादलेखन आणि नाट्यलेखनातही उल्लेखनीय काम केले. पात्रांच्या स्वभावानुसार संवाद लिहिणे आणि कथानकाला पुढे नेण्यासाठी योग्य शब्दांचा वापर करणे ही त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये होती. साध्या भाषेत गंभीर विषय मांडण्याची त्यांची हातोटी विशेष उल्लेखनीय होती. त्यामुळे त्यांच्या लेखनाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला.दूरदर्शन क्षेत्रातही त्यांनी विविध मालिकांसाठी लेखन केले. मनोरंजन क्षेत्रातील वेगवेगळ्या माध्यमांमध्ये काम करताना त्यांनी ओडिया भाषेतील साहित्यिक आणि सांस्कृतिक वैशिष्ट्ये जपली. त्यांच्या लेखनातून स्थानिक समाजजीवन, नातेसंबंध आणि मानवी



स्वभावाचे विविध पैलू प्रेक्षकांसमोर आले.रणजित पटनायक यांच्या निधनाने ओडिया मनोरंजन क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली. १० ऑगस्ट २०२२ रोजी कटक येथे वयाच्या ६५व्या वर्षी त्यांचे निधन झाले. ते काही काळापासून यकृताशी संबंधित आजाराने त्रस्त होते. त्यांच्या निधनाची बातमी समोर आल्यानंतर ओडिया चित्रपटसृष्टीतील कलाकार, दिग्दर्शक, लेखक आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी शोक व्यक्त केला.रणजित पटनायक यांनी आपल्या लेखणीच्या माध्यमातून ओडिया चित्रपटसृष्टीला समृद्ध केले. पटकथा, संवाद, नाटक आणि दूरदर्शन या विविध क्षेत्रांमध्ये त्यांनी केलेले कार्य त्यांच्या सर्जनशीलतेची साक्ष देते. कथा प्रभावीपणे मांडणे, पात्रांना जिवंतपणा देणे आणि संवादातून भावना व्यक्त करणे ही त्यांच्या लेखनाची प्रमुख वैशिष्ट्ये होती.त्यांच्या निधनाने ओडिया चित्रपटसृष्टीने एक संवेदनशील आणि प्रतिभावान लेखक गमावला. त्यांनी निर्माण केलेल्या कथा, लिहिलेले संवाद आणि विविध कलाकृतींच्या माध्यमातून त्यांचे योगदान दीर्घकाळ स्मरणात राहील.

## बुवासाहेब नवले पतसंस्थेची १७६८ कोटींची उलाढाल

### ठेवी ३१० कोटींवर तर सभासदांना ५ टक्के लाभांश जाहीर

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - बुवासाहेब नवले ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्यादित (अकोले) आणि मल्टिस्टेटच्या एकूण ठेवी साडेपाचशे कोटींवर पोहोचल्या आहेत. केवळ पतसंस्थेच्या ठेवी ३१० कोटींवर गेल्या असून संस्थेची वार्षिक उलाढाल १७६८ कोटी रुपयांची झाली आहे, अशी माहिती संस्थापक चेअरमन मधुकरराव नवले यांनी दिली.

अकोले येथील महाराजा लॉन्समध्ये संस्थेची ३५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा मधुकरराव नवले यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी ते बोलत होते. सभेला व्हाईस चेअरमन रमेश जगताप, ज्येष्ठ नेते कचरु पाटील शेटे, जनलक्ष्मी पतसंस्थेचे चेअरमन भाऊपाटील नवले, लक्ष्मी पतसंस्थेचे चेअरमन प्रवीण मालुंजकर, शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन प्रा. दीपक जोंधळे, स्वामी समर्थ पतसंस्थेचे चेअरमन मंगळा तळपडे यांच्यासह आजी-माजी पदाधिकारी व संचालक उपस्थित होते.

संस्थेच्या आर्थिक प्रगतीचा आढावा घेताना मधुकरराव नवले म्हणाले की, मार्च २०२६ अखेर ठेवी २९३ कोटी होत्या, त्यात २८ कोटींची वाढ होऊन त्या आज ३१० कोटींवर पोहोचल्या आहेत. कर्ज थकबाकीचे प्रमाण ३.११ टक्के असून ते

गतवर्षीच्या तुलनेत ०.३० टक्क्यांनी कमी झाले आहे. संस्थेची मालमत्ता ३० कोटींची असून, यावर्षीच्या १७६८ कोटींच्या उलाढालीत २२३ कोटींची वाढ झाली आहे.

सुवर्णतारण कर्जदार सोने सोडवून नेताना सभासदत्व रद्द करत असल्याने सभासद संख्या १३९४ ने कमी झाली आहे. मात्र संस्थेचे भागभांडवल वाढले असून सभासदांना ५ टक्के लाभांश दिला जाणार आहे. संस्थेला आर्थिक वर्षात ऑडिट वर्ग 'अ' मिळाला असून आमची स्पर्धा आता राष्ट्रीयकृत बँकांबरोबर असल्याचे नवले यांनी स्पष्ट केले. संचालक मंडळाने त्यांच्या नातेवाईकांना दिलेल्या कर्जाच्या थकबाकीचे प्रमाण अवघे १.७३ टक्के असल्याचेही त्यांनी नमूद केले.

सभेच्या सुरुवातीला स्वातंत्र्यसैनिक बुवासाहेब नवले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. दिवंगत संचालिका मंदाताई नवले व इतर मृत सभासदांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. सरव्यवस्थापक लखन शिंदे यांनी नोटीस वाचन केले, तर सतीश नवले यांनी गत सभेचे इतिवृत्त वाचले. यावेळी संस्थेचे संचालक आणि सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिवाजी चौधरी यांनी आभार मानले.

## जि. प. शाळा जाखुरीच्या व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी सुनील बन्सी मांडे तर माजी विद्यार्थी संघाच्या अध्यक्षपदी नवनाथ भाऊसाहेब पानसरे यांची निवड

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जाखुरी येथील शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी सुनील मांडे यांची, तर माजी विद्यार्थी संघाच्या अध्यक्षपदी नवनाथ पानसरे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.

शाळेत आयोजित करण्यात आलेल्या विशेष पालक सभेत ही निवड प्रक्रिया पार पडली. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांचे पालक, माजी विद्यार्थी तसेच महिला पालकांची लक्षणीय उपस्थिती होती. शाळा व्यवस्थापन समितीच्या नव्याने निवड झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचा शाळा प्रशासन व ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला.



यावेळी माजी व्यवस्थापन समिती अध्यक्ष अमोल पानसरे यांनी आपल्या मनोगता मधून सर्वांच्या सहकार्याबद्दल आभार मानले. शाळेच्या सर्वांगीण विकासाचा संकल्प करताना नवनिर्वाचित अध्यक्ष सुनील मांडे यांनी सत्काराला उत्तर देताना सांगितले की, शाळेचा दर्जा अधिक उंचावणे, विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त चांगल्या भौतिक सुविधा उपलब्ध करून देणे आणि गुणवत्तेवर भर देणे हाच आमचा मुख्य उद्देश राहील. तर माजी विद्यार्थी संघाचे नवनिर्वाचित अध्यक्ष नवनाथ पानसरे यांनी, शाळेच्या प्रगतीत माजी विद्यार्थ्यांचे योगदान मोलाचे राहील व विविध उपक्रमांच्या माध्यमातून शाळेला सहकार्य केले जाईल, असा विश्वास व्यक्त केला.

यावेळी शाळेत राबवित असलेल्या विविध गुणवत्ता पूर्ण उपक्रमाबद्दल उपस्थितांनी समाधान व्यक्त केले.

या कार्यक्रमास जाखुरी गावातील सर्व शिक्षणप्रेमी कार्यकर्ते मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, व माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक श्रीम. दिपाली रेपाळ मॅडम यांनी केले तर आभार प्रदर्शन उपाध्यापिका समीना बागवान मॅडम यांनी केले. सर्व स्तरांतून नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन होत आहे.

## प्रवरेत वाहून गेलेल्या युवकाचा दहा दिवसांनी राहुरीजवळ सापडला मृतदेह

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर शहरातील गंगामाई घाट परिसरातून प्रवरा नदीच्या पुराच्या पाण्यात वाहून गेलेल्या २५ वर्षीय ऋषिकेश नवनाथ गडाख (रा. पारेगाव बु, ता. संगमनेर) या युवकाचा मृतदेह दहा दिवसांच्या अथांग शोधकार्यानंतर शनिवारी (८ ऑगस्ट) दुपारी राहुरी तालुक्यातील धानोरे घाटाजवळ छिन्नविच्छिन्न अवस्थेत आढळून आला.



गुरुवारी (३० जुलै) दुपारी १ वाजण्याच्या सुमारास ऋषिकेश गडाख गंगामाई घाट परिसरात प्रवरा नदी पात्रात पोहण्यासाठी उतरला होता. धरणातून पाण्याचा मोठा विसर्ग सुरू असल्याने आणि नदी दुथडी भरून वाहत असल्याने त्याला पाण्याच्या वेगाचा अंदाज आला नाही. पाण्याचा प्रचंड वेग त्याला ओढून घेऊन गेला. तो बुडत असल्याचे पाहून उपस्थितांनी आरडाओरड केली, परंतु पाण्याचा प्रवाह अतिशय वेगवान असल्याने काही वेळातच तो दिसेनासा झाला.

युवक वाहून गेल्याची माहिती मिळताच संगमनेर नगर परिषदेचे आपत्कालीन रक्षक दल, पोलीस प्रशासन आणि महसूल विभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. स्थानिक अनुभवी जलतरणपटू आणि जीवरक्षकांच्या मदतीने गंगामाई घाटापासून ते ओझर, अकोले आणि राहुरीच्या दिशेने नदीपात्रात सलग १० दिवस व्यापक शोधमोहीम राबवण्यात आली. पूरपरिस्थिती आणि पाण्याचा प्रचंड वेग यामुळे शोधकार्यात मोठे अडथळे येत होते. शनिवारी १० व्या दिवशी राहुरी तालुक्यातील धानोरे घाटाजवळील नदीच्या कडेला एक मृतदेह अडकलेला स्थानिकांना दिसला. घटनेची माहिती मिळताच प्रशासकीय पथकाने धाव घेऊन पाहणी केली असता, तो मृतदेह ऋषिकेश गडाख याचाच असल्याचे निष्पन्न झाले.

## संगमनेर-अकोले हादरले; भूकंपाच्या धक्क्याने नागरिकांमध्ये घबराट

### संगमनेरमध्ये ४.३ रिश्टरची नोंद; घरांचे दरवाजे-खिडक्या, वस्तू हलल्या

युवावार्ता (प्रतिनिधी)


संगमनेर - अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर, अकोले आणि राहुरी तालुक्याच्या काही भागांना शनिवारी (ता. ८) रात्री सुमारे दहा वाजण्याच्या सुमारास भूकंपाचा धक्का जाणवला. अचानक काही सेकंदांसाठी जाणवलेल्या या हादऱ्यामुळे नागरिकांमध्ये एकच खळबळ उडाली. संगमनेर परिसरात या भूकंपाची ४.३ रिश्टर स्केल इतकी तीव्रता नोंदविण्यात आल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

संगमनेर तालुक्यातील मंगळापूर, जवळे कडलग, पिंप्री लौकी-अजमपूर, घारगाव, कोठे बुद्रुक आणि चिखली यांसह काही गावांमध्ये भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले. अचानक घरांना हादरे बसल्याने काही ठिकाणी घरातील भांडी व इतर वस्तू हलल्या, तर दरवाजे आणि खिडक्यांचीही हालचाल झाल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

रात्रीच्या वेळी अचानक जाणवलेल्या या धक्क्यामुळे अनेक नागरिक घाबरले. खबरदारीचा उपाय म्हणून काही नागरिकांनी तातडीने घराबाहेर पडून मोकळ्या जागेचा आधार घेतला. काही क्षणांच्या या हादऱ्याने परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले.

'मेरी'च्या यंत्रावर अधिकृत नोंद- नाशिक येथील 'मेरी' संस्थेच्या भूकंपमापक यंत्रावर या भूगर्भातील हालचालीची नोंद झाल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली. संगमनेर परिसरातील भूकंपाची तीव्रता ४.३ रिश्टर स्केल असल्याचे सांगण्यात आले आहे.

दरम्यान, अकोले तालुक्यातील अंबड, उंचखडक, सुगाव, कळस आणि औरंगपूर परिसरातही रात्री दहा ते अकराच्या दरम्यान भूकंपाचे सौम्य हादरे जाणवल्याचे नागरिकांनी सांगितले. घरांना आणि परिसराला अचानक हादरे जाणवल्याने नागरिकांमध्ये काही काळ



भीतीचे वातावरण होते. धक्के जाणवल्यानंतर नागरिकांनी एकमेकांशी संपर्क साधून परिस्थितीची माहिती घेतली.

अहिल्यानगर जिल्ह्यातील काही भागांसोबतच नाशिक जिल्ह्यातही शनिवारी रात्री भूकंपाचा धक्का जाणवल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये भूकंपाच्या धक्क्याची चर्चा सुरू झाली.

अफवांवर विश्वास ठेवू नका; प्रशासनाचे आवाहन- भूकंपाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी घाबरून न जाता सतर्क राहावे, तसेच कोणत्याही प्रकारच्या अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन तहसीलदार धीरज मांजरे यांनी केले आहे. कोणतीही दुर्घटना घडल्यास किंवा संशयास्पद घटना निदर्शनास आल्यास प्रशासनाला तत्काळ माहिती द्यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणानेही नागरिकांना सतर्क आणि जागरूक राहण्याचे आवाहन केले आहे. विशेषतः कच्च्या बांधकामाच्या घरांमध्ये राहणाऱ्या नागरिकांनी अधिक खबरदारी घ्यावी, असे प्रशासनाने सांगितले आहे.

भूकंपामुळे अद्याप कोणतीही मोठी जीवित किंवा वित्तहानी झाल्याची माहिती समोर आलेली नसली, तरी अचानक जाणवलेल्या हादऱ्यामुळे संगमनेर आणि अकोले तालुक्यातील नागरिकांमध्ये मात्र काही काळ चिंतेचे वातावरण निर्माण झाले.

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
आधुनिक उपचार पद्धती
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक युवावार्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# शेततळ्यात बुडून आजोबा, नातवाचा मृत्यू

## शेततळ्याचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर



युवावार्ता (वृत्तसंस्था)

संगमनेर - पाय घसरून शेततळ्यात पडलेल्या नातवाला वाचविण्यासाठी आजोबांनी शेततळ्यात उडी घेतली. मात्र, नातवाला वाचविताना आजोबांचाही पाण्यात बुडून मृत्यू झाला. ही घटना सावरगाव तळ (ता. संगमनेर) येथील मांडवदरा वस्तीवर रविवारी (ता. ९) सायंकाळी साडेपाच ते सहा वाजण्याच्या सुमारास घडली. सर्वेश संतोष गुळवे (वय १२) आणि त्याचे आजोबा पांडुरंग रखमा गुळवे (वय ५७) अशी मृतांची नावे आहेत.

सावरगाव जळ परिसरातील मांडवदरा वस्ती येथे पांडुरंग रखमा गुळवे हे कुटुंबासह राहत होते. त्यांच्या घरापासून काही अंतरावर शेततळे आहे. रविवारी सायंकाळी त्यांचा नातू सर्वेश गुळवे हा शेततळ्याजवळ गेला असता अचानक त्याचा पाय घसरला आणि तो शेततळ्यात पडला.

सर्वेशच्या बहिणीने त्याला शेततळ्यात पडताना पाहिले. तिने आरडाओरड करून मदतीसाठी आवाज दिला. तिचा आवाज ऐकून जवळच असलेले आजोबा पांडुरंग गुळवे हे तातडीने घटनास्थळी धावून आले. नातवाला वाचविण्यासाठी त्यांनी कोणताही विचार न करता थेट शेततळ्यात उडी घेतली. मात्र, पाण्याची खोली आणि परिस्थितीमुळे दोघांनाही पाण्यातून बाहेर येता आले नाही. अखेर दोघांचाही शेततळ्यात बुडून मृत्यू झाला.

या घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली, नागरिकांनी शोधमोहीम राबवून दोघांना शेततळ्यातून बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, घटनेची माहिती पोलिस पाटील गोरक्षनाथ नेहे यांनी संगमनेर तालुका पोलिसांना दिली माहिती समजताच पोलिस ठाण्याचे पोलिस हवालदार अमित महाजण, सहाय्यक फौजदार बन्सी टोपले, पोलिस हेड कॉन्स्टेबल शांताराम झोडगे, प्रदीप बडे यांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिस निरीक्षक प्रवीण साळुंखे हे देखील घटनास्थळी दाखल झाले. नागरिकांच्या मदतीने आजोबा आणि नातवाचे मृतदेह शेततळ्यातून बाहेर काढण्यात आले. त्यानंतर दोन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी घुलेवाडी येथील ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आले.

# पंतप्रधानांची राष्ट्रवादीच्या आठ खासदारांशी भेट

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)च्या खासदारांनी सोमवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतल्याने महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. खासदार सुप्रिया सुळे यांच्यासह पक्षाच्या आठ खासदारांनी पंतप्रधानांची भेट घेत विविध मतदारसंघातील प्रलंबित विकासकामे, पाणीटंचाई, शेतकरी, विद्यार्थी तसेच अन्य लोकहिताच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली.

या भेटीला राजकीय पार्श्वभूमी असल्याने राज्यातील राजकीय समीकरणांच्या दृष्टीने या बैठकीकडे विशेष लक्ष लागले होते. मात्र राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) एनडीएमध्ये जाणार असल्याच्या चर्चांना पक्षाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी स्पष्ट शब्दांत फेटाळून लावले. या भेटीत कोणतीही राजकीय चर्चा झाली नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. बैठकीत महाराष्ट्रातील खासदारांनी आपापल्या मतदारसंघातील प्रलंबित प्रश्न थेट मांडले. लोकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित समस्या तसेच विकासकामांना गती देण्याची मागणी यावेळी करण्यात आली. खासदार निलेश लंके यांनी प्रत्येक जिल्ह्यात स्वतंत्र कर्करोग रुग्णालय उभारण्याची मागणी पंतप्रधानांसमोर केली. बैठकीदरम्यान खासदारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा महात्मा फुले यांची पगडी व उपरणे देऊन सन्मान केला. तसेच राजदंड हातात असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळाही त्यांना भेट देण्यात आला. या भेटीपलीकडे कोणत्याही राजकीय समीकरणांवर चर्चा झालेली नसल्याचे डॉ. अमोल कोल्हे यांनी सांगितले. डिलिमिटेशन विधेयकाला राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पाठिंबा देणार का, असा प्रश्न विचारला असता डॉ. अमोल कोल्हे यांनी सावध भूमिका घेतली. अद्याप कोणतेही विधेयक आलेले नसताना त्यावर चर्चा करण्याला अर्थ नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. या भेटीदरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या ऊर्जेचे आणि कार्यक्षमतेचे कौतुक केल्याची माहितीही डॉ. अमोल कोल्हे यांनी दिली.

# संगमनेरमध्ये आदिवासी दिनानिमित्त भव्य मिरवणूक

## आ. अमोल खताळ यांचा सहभाग



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -जागतिक आदिवासी दिनानिमित्त संगमनेर शहरात आदिवासी बांधवांच्या वतीने भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले. पारंपरिक वाद्यांचा गजर, आदिवासी नृत्य, विविध सांस्कृतिक सादरीकरणे आणि जोरदार घोषणांनी संपूर्ण शहराचा परिसर दुमदुमून गेला. या मिरवणुकीत आमदार अमोल खताळ यांनीही उत्स्फूर्तपणे सहभागी होत आदिवासी बांधवांचा उत्साह वाढविला.

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून मिरवणुकीला सुरुवात करण्यात आली. त्यानंतर बसस्थानक, नवीन अकोले रोड आणि बायपास मार्गे मिरवणूक मातोश्री लॉन्स येथे पोहोचली. तेथे विविध कार्यक्रमांनी मिरवणुकीची सांगता करण्यात आली.

मिरवणुकीदरम्यान आदिवासी समाजाच्या समृद्ध परंपरा, संस्कृती, कला आणि लोकजीवनाचे अनोखे दर्शन घडले. पारंपरिक वाद्यांच्या तालावर सादर करण्यात आलेल्या आदिवासी नृत्यांनी उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले. महिला, तरुण-तरुणी, ज्येष्ठ नागरिक तसेच बालकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत मिरवणुकीत चैतन्य निर्माण केले.

यावेळी आदिवासी समाजाने जल, जंगल आणि जमीन यांच्या संरक्षणासाठी दिलेल्या ऐतिहासिक योगदानाचे स्मरण करण्यात आले. तसेच देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या आदिवासी क्रांतीवीरांना अभिवादन करण्यात आले. आदिवासी समाजाच्या हक्कांचे संरक्षण, त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे जतन करणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी असल्याचा संदेश यावेळी देण्यात आला. यावेळी बोलताना आमदार अमोल खताळ म्हणाले, आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण, रोजगार, आरोग्य, मूलभूत सुविधा तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत. आदिवासी बांधवांच्या हक्कांचे संरक्षण करत त्यांच्या विकासाला अधिक गती देणे हीच क्रांतीवीरांना खरी आदरांजली ठरेल.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात
अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ | * कर्ज व्याजदर कमी | * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
- मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
- पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
- हेल्थ इंडिया इन्शुरन्स
- FHPL हेल्थ इन्शुरन्स
- इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
- बजाज आलियांज इन्शुरन्स
- एसबीआय जनरल इन्शुरन्स
- ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
- मेडसेव टीपीए प्रा.लि.
- जेनिन्स इंडिया टीपीए लि.
- ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
- टाटा एआयजी इन्शुरन्स
- रिलायन्स जनरल इन्शुरन्स
- मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)
सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध
- चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
- नॅशनल इन्शुरन्स कं.
- न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
- निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
- युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
- स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
- दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
- एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
- युनायटेड हेल्थकेअर लि.
- Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
- मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
- एम.डी.इंडिया हेल्थकेअर
- विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
- पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)
02425 - 224761, मोबा. 7038170382

Direct Walk-in Interview!
BIZ INTERNATIONAL FLUSH DOORS BLOCK BOARDS PLYWOODS





| | |
|---|---|
| Post | Accounts & Purchase Executive |
| Qualification | B.Com / M.Com / Any Graduate |
| Experience | 1-3 Years (Accounts & Purchase) |
| Skills | Purchase Plus, Tally, GST Billing, MS Excel |

Place : Sangamner
Contact : 8668697302

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165



दर्शन टेक्सटाईल मार्केट
तुमच्या प्रत्येक लूकसाठी खास डिझाइन्स
30% ते 70% डिस्काउंट सेल
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
टी शर्ट | जिन्स | फॉर्मल ड्रेस
ब्लेज़र | जाकेट
संपर्क :- 8390005001 पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605



अविवाहित, नवविवाहित, चाळीशिनंतरच्या, लठ्ठ, मधुमेह, थायरॉईड, PCOD सारखे हार्मोनल डिफेक्ट असलेल्या
स्त्रियांच्या समस्या
मासिक पाळीच्या तक्रारी | योनी मार्गाची दुर्गंधी
अंगावरून पांढरे जाणे | गुप्त अंगाला खाज
गर्भ न रहाणे | विविध त्वचा विकार
वारंवार गर्भपात होणे | गुप्तरोग, गर्मी
गर्भाशयात गाठी | लघवीला जळजळ
गर्भाशयाचा कर्करोग | संभोगात रस न येणे
स्तनांची वाढ न होणे | संभोगा विषयीची भीती
स्तनातून दूध न येणे | हस्तमैंथूनाची सवय
स्तनात गाठी | लैंगिक विकृती
स्तनाचा कर्करोग | मानसिक नैराश्य



डॉ. मोना अभय मुथा
B.H.M.S., C.G.O., D.Ac
होमिओपॅथिक कन्सल्टंट
स्त्री रोग चिकित्सक
( ३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव )
1 लाखांहून अधिक महिलांचा यशस्वी उपचार | ISO मानांकन प्राप्त
डॉ. मुथाज् होमिओपॅथिक क्लिनिक विनायकनगर, नगर - पुणे रोड, अहिल्यानगर
www.homoeopathictreatment.in 91 30 30 90 13

स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिश्रमनाय्
कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
- सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
- अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
- अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25